
# नवी पहाट

मयुर देशमुख



# नवी पहाट

## लघुकादंबरी

मयुर अनिल देशमुख

ई साहित्य प्रतिष्ठान

# नवी पहाट (लघुकादंबरी)


## मयुर अनिल देशमुख

वय वर्ष- वीस
विद्यार्थी
whatsapp/mobile- +917887489309
Email- Dmayur37@gmail.com
पत्ता- हॉटेल ब्रिजकॉर्नरच्या पाठीमागे,
विद्युतसरीता कॉलनी,
ता. चाळीसगाव जि. जळगाव 424101



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .



संपादक : अनघा हिरे

anagha.hiray@gmail.com

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन --- २ एप्रिल २०१७



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

मनोगत-

आजच्या काळात खरे संत ओळखणं फार अवघड होऊन बसलंय. कारण आजच्या माणसाने संतांची पुरातन काळापासून चालत आलेली व्याख्याच बदलून टाकली आहे. त्याला चमत्कार करणारे संत वाटू लागले आहेत. चमत्कार करणारे संत नसतात असा याचा अर्थ नाही. पण चमत्कार करणारे सर्वच संत असतात हेही तितकच खोटंय. कारण तसं असतं तर तुकारामांचे संत तुकाराम आणि मदर तेरेसांच्या संत मदर तेरेसा झाल्या नसत्या.

खरं सांगायचं झालं तर आजच्या काळात ज्याप्रमाणे भगवी वस्त्र धारण केलेले कितीतरी भोंदूबाबा जागोजागी सापडत असतात, त्याचप्रमाणे शर्टपैंट  घालणारेसुद्धा संत जागोजागी कार्यरत असतात.  आपण स्वत: तो शर्टपैंट घालणारा संत होऊ शकत नसू तर निदान त्यांना शोधून त्यांच्या कार्याला प्रोस्ताहन देण्याचं कार्य आपण केलं पाहीजे असं मला वाटतं.

असो. हे विषयांतर झालं.

सांगायचं एवढंच आहे कि या कथेतला कबीरसुद्धा असाच एक शर्टपैंट घालणारा संत होता असं निदान मला वाटतं. अर्थात तो संत होता कि नव्हता हे तुम्हाला म्हणजेच वाचकांना ठरवायचंय.

पुस्तक आवडल्यास प्रतिक्रिया जरुर कळवा.

whatsapp/mobile- +917887489309

Email- Dmayur37@gmail.com

मयुर अनिल देशमुख

वय वर्ष- वीस

विद्यार्थी

Mobile- 7887489309

Email- Dmayur37@gmail.com

पत्ता- हॉटेल ब्रिजकॉर्नरच्या पाठीमागे,

विद्युतसरीता कॉलनी,

ता. चाळीसगाव जि. जळगाव 424101

## अर्पणपत्रिका

आधी स्वत:मध्ये बदल घडवुन जग बदलवणाऱ्या सर्व महानात्म्यांना हे पुस्तक समर्पित!!

## नवी पहाट

आणि ती रेल्वे धगधग करत चंदनपूरात येऊन थांबली. आज रविवारचा दिवस असल्या कारणाने स्टेशनवर बरीच वर्दळ दिसत होती. येणारे येत होते आणि जाणारे जात होते. चंदनपूर तसं एक छोटं खेडं होतं. पण रेल्वे स्टेशन असल्यामुळे गावाला अलिकडे महत्व प्राप्त झालं होतं. ते जणू एखादं छोटं शहरच होतं. शहरात असतात त्या सर्व सोयीसुविधा गावात होत्या. अशातच तो तरुण गाडीतून खाली उतरला. उंचपुरी शरीरयष्टी, बांधेसुद खांदे असा तो तरुण होता. काळासावळा असला तरी त्याच्या चेहऱ्यावर तेज झळकत होतं. त्याचा पोशाख इतर तरुणांसारखा नव्हता आणि त्याचमुळे तो सर्वांच लक्ष वेधून घेत होता. त्याने अतिशय साधे कपडे परिधान केले होते. त्याचबरोबर एक रुद्राक्षमाळ त्याच्या पिळदार छातीवरुन रुळत होती. सामान म्हणून तो फक्त एक छोटी ट्रंक स्वत:जवळ बाळगत असे. तो तसाच पुढे चालत राहिला. आणि तेवढ्यात दोन-तीन रिक्षावाले त्याला समोरुन विचारु लागले,

'बाबुजी कहीँ जाना है क्या? आओ छोड देता हूं!'

'या बसा, ही माझी रिक्षा!' असं म्हणत तो दुसरा रिक्षावाला त्याला ओढतच त्याच्या रिक्षाजवळ घेऊन गेला.

'अरे हो हो! थांबा थोडं. इथे जवळच संस्कृतीमंदिर आहे ना, तिथेच जायचंय मला.' अविनाश म्हणाला.

संस्कृतीमंदिराचं नाव ऐकताच सर्व रिक्षावाले पांगू लागले. तेव्हा तोच पहिला एकजण समोर आला.

'आईये बाबुजी, मै छोड देता हूं आपको' तो असं म्हणताच अविनाशही त्याच्या रिक्षात जाऊन बसला. आणि रिक्षा धूर फेकत संस्कृतीमंदिराच्या दिशेने जाऊ लागली.

'संस्कृतीमंदिराचं नाव ऐकताच सर्व रिक्षावाले असे निघून का गेले?' अविनाशने विचारलं.

'हो बाबुजी, कारण हल्ली तिकडे जात नाही ना कोणी जास्त! हल्ली काय सर्व पोरं नाटकं सिनेमे पाहायला जातात. संस्कृतीमंदिराकडे जायला कोणालाच वेळ नाही. त्याच्यामुळे रिक्षावालेपण फारसे फिरकत नाही त्या भागात.'

'मग तु तरी का आलास?' अविनाशने विचारले.

'कारण बाबुजी तुम्ही नेकदिल वाटलात मला.'

अविनाशच्या चेहऱ्यावर हलकी स्मितरेषा उमटली.

'तुझं नाव काय आहे?'

'जावेद नाव आहे बाबुजी माझं. इथे जवळच आमचा मोहल्ला आहे. तिथेच बायकापोरां सोबत राहतो मी.'

त्याचं नाव ऐकून अविनाश थोडा विचार करायला लागला. तो क्षणभर त्याच्याच विश्वात बुडून गेला होता.

'क्या सोच रहे हो बाबुजी?' जावेदने विचारलं.

'अं, अरे काही नाही, असंच'

'आप यही सोच रहे हो ना कै मुसलमान होकरभी मैने हिँदूकी मदद क्यूं की?'

'अं, हो म्हणजे आपल्या देशातली सध्याची परिस्थिती पाहता तू असं वागून मला विचार करायला भाग पाडलंय.' अविनाश म्हणाला.

'हिँदू मुसलमान एक दुसरेसे अलग थोडी ना है बाबुजी. धर्म तो इंसानका होता है. जो इंसानने बनाया वो इंसानका होता है. लेकिन जिसने इंसानको बनाया, जो इंसानको चलाता है, उसका तो कोई धर्म नहीं होता. उसका तो बस एकही धर्म होता है इंसानियत! और मै वही मानता हूं!'

तेवढ्यात संस्कृतीमंदिराचं गेट समोर दिसू लागलं.

'ये आ गया बाबुजी आपका संस्कृतीमंदिर!' जावेद म्हणाला.

पण अविनाश त्याचं बोलणं ऐकून भारावून गेला होता. तो त्याच्या विचारात अखंड बुडालेला होता.

'बाबुजी...' जावेदने परत आवाज दिला.

'अं, अरे हो, आले वाटतं संस्कृतीमंदिर!' असं म्हणत त्याने त्याची ट्रंक उचलली आणि तो खाली उतरला.

'छान वाटलं जावेद तुझ्याशी बोलून, बरं किती पैसे झालेत?'

'तुमच्यासारख्या नेक माणसाकडून पैसे घेणं बरं नाही वाटत, पण तरी तुम्हाला जे द्यायचे असतील ते द्या!'

अविनाशने त्याच्याकडे पाहून हलकेच स्मित केले, आणि हिशोबाने त्याला वीस रुपये काढून दिले.

'ठिक है बाबुजी, चलता हूं!'

'ये कधीतरी संस्कृतीमंदिरात, तुझ्यासारख्यांचीही गरज आहे इथे!'

'जरुर आऊंगा बाबुजी, अगर वक्तसे फुर्सत मिल जायेगी तो आपसे मिलने जरुर आऊंगा. चलता हूं.' असं म्हणत जावेदने आपली रिक्षा वळवली आणि त्याची रिक्षा माघारी निघाली. अविनाश त्या पाठमोऱ्या रिक्षाकडे तसाच पाहात उभा होता. एकदाची ती रिक्षा त्याच्या दृष्टिआड गेली तेव्हा कुठे त्याचं चित्त ठिकाणावर आलं. आता तो संस्कृतीमंदिराच्या गेटसमोर उभा होता. वर ठळक अक्षरात 'स्वामी विवेकानंद संस्कृतीमंदिर' असं लिहीलेली पाटी होती. जवळपास सात एकराच्या परिसरात ते संस्कृतीमंदिर उभारलं गेलं होतं. अविनाशने बंद लोखंडी गेट उघडलं आणि तो आत शिरला.

आत गेल्यावर समोरच व्यवस्थापकांचं ऑफिस होतं. विचारणा केल्यावर कळालं कि व्यवस्थापक बाहेर गेले होते. अविनाश तिथेच बाकावर बसला. जवळपास वीसेक मिनिटांनी व्यवस्थापक आले.

'नमस्कार'

'नमस्कार, मी अविनाश! काही दिवसांपूर्वी या संस्कृतीमंदिरात प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला होता. तसं आपलं फोनवरही बोलणं झालंय!'

'बरंबरं, बघतो मी!' असं म्हणत व्यवस्थापकांनी रजिस्टर उघडलं आणि ते नाव शोधू लागले.

'अविनाश मुरलीधर माने! तुम्ही कायद्याचा अभ्यास केलाय!' व्यवस्थापक म्हणाले.

'हो! केलाय खरा अभ्यास. पण त्याचबरोबर संस्कृतीबद्दलही जाणून घ्यावं असं वाटत होतं. म्हणून इथे अर्ज केला होता.' अविनाश म्हणाला.

'अच्छा! चांगलंय मग! तुम्ही इथे रहा, हवा तेवढा वेळ हवा तेवढा अभ्यास करा, चर्चा करा. तुम्हाला इथे कसलीही कमतरता भासणार नाही.'

'मला इथे शांतता लाभेल?' अविनाशने विचारलं.

'हो तीही लाभेल!' व्यवस्थापकांनी असं म्हणताच दोघंही एकमेकांकडे पाहून स्मित करु लागले. पण अविनाशच्या मनात विचार चमकून गेला, आपल्याला इथे खरंच शांतता लाभेल? ज्या शांततेसाठी आपण आयुष्यभर भटकत आलोय, जी शांतता आपल्याला ना अरविंदांच्या आश्रमात मिळाली, ना स्वामींजींच्या बेलूर मठात लाभली. काशीलाही नाही आणि हरिद्वार, ह्रषिकेशातही जी लाभली नाही, ती शांतता खरचं इथे लाभेल?' अविनाशला त्याचा भूतकाळ आठवत होता. पण आता इथे आलोय तर राहण्यात काय गैर आहे, असा विचार करुन तो तिथून उठला.

तेवढ्यात व्यवस्थापकांनी तिथल्या एका गड्याला हाक मारली,

'सदू, ए सदू!'

सदू धावतच खोलीत आला.

'हे अविनाश आहेत. आजपासून इथेच राहतील. यांना त्यांची खोली दाखव आणि सर्व व्यवस्थाही समजावून दे.' व्यवस्थापक म्हणाले.

'या दादा!' असं म्हणत सदूने अविनाशला त्याची खोली दाखवली. खोली छान होती. समोरच एक मोठा टेबल होता. एक जुना लोखंडी पलंगही होता.

'इथे बाजूलाच आंघोळीची व्यवस्था आहे. तिथेच गरम पाण्याचीही सोय केली आहे.' सदू म्हणाला.

तेवढ्यात एक उंच, गोरा, अविनाशच्याच वयाचा तरुण तिथे आला.

'अरे सदू, कुठे होतास तू केव्हाचा?' त्याने विचारलं.

'कबीरदादा, मला साहेबांनी बोलवलं होतं. हे अविनाशदादा आहेत, यांचीच सोय करायची होती.' सदू म्हणाला.

'नवीन आलास वाटतं?' कबीरने अविनाशला उद्देशून विचारलं.

'हो! आजच आलोय!' अविनाश म्हणाला.

'कबीरदादा, माझ्याकडे काही काम होतं का?' सदूने विचारलं.

'अरे काही नाही, झाडांना पाणी द्यायचं होतं. तो मोगरा वाळत चाललाय रे! पण काळजी नको करु, मी दिलंय आत्ताच पाणी. फक्त पुढच्यावेळेपासनं लक्षात ठेव.' कबीर म्हणाला.

'बरं दादा! येतो मी!' असं म्हणत सदू निघून गेला.

'तू फार दमलेला दिसतोय!' कबीर अविनाशला उद्देशून म्हणाला.

'हो म्हणजे तीन-चार दिवसांचा सलग प्रवास झालाय, म्हणून दमलोय जरा. आता आंघोळ करुन घेतो, तीन दिवसांपासनं आंघोळपण केली नाहीये.' अविनाश म्हणाला.

'अच्छा!' म्हणत कबीर त्याच्या खोलीत गेला आणि त्याने एक बादली अविनाशला आणुन दिली.

'ही बादली घे आंघोळीसाठी.'

'मी आभारी आहे.'

'अरे आभार कसले मानतोय? आपण सर्वजण इथे एकाच ध्येयासाठी जमलेलो आहोत, तेव्हा एकमेकांना सोबत घेऊनच चालावं लागणार. असू दे! येतो मी आता. तू इथेच आहेस म्हटल्यावर पुन्हा भेट होईलचं.' असं म्हणत कबीर तिथून निघून गेला.

अविनाशही अंघोळीला गेला. बराच वेळ आंघोळ केल्यानंतर तो खोलीत आला. त्याने खोलीत एक दोरी बांधून त्यावर कपडे वाळायला टाकले. त्याचबरोबर नवीन स्वच्छ कपडेही घातले. जणू तीन-चार दिवसांपासूनची मरगळ आता दुर निघून गेली होती. त्याने त्याची ट्रंक उघडली, व त्यातून एक चादर काढून ती पलंगावर अंथरली. स्वामी विवेकानंदांचं चरित्र आणि त्यांचीच एक फोटोफ्रेम टेबलवर ठेवले. अजुनही दोन-चार पुस्तके होती, तीही त्याने टेबलावर ठेवली. आता तो निवांत होता. जेवणाला अजून अवकाश असल्याकारणाने त्याने एक पुस्तक घेतले आणि ते तो वाचत बसला. वाचता वाचताच त्याच्या मनात कबीरबद्दल विचार येऊ लागले. पहिल्याच भेटीत कबीरने त्याला आपलंसं करुन घेतलं होतं. आणि त्यामुळे अविनाशलाही

त्याच्याबद्दल आपुलकी वाटायला लागली होती. जणू तो त्याच्याचसाठी तिथे आला होता, असं त्याला वाटू लागलं होतं. आणि अशातच अविनाशचा डोळा लागला. त्याला जाग आली ती थेट सदूच्या आवाजाने,

'दादा, अविनाशदादा'

'अं?'

'उठा! जेवायला येताय ना?'

'जेवायला? हो येतो ना, तू जा पुढे मी येतो.'

सदू निघून गेला.

अविनाशने चेहरा पाण्याने धुतला आणि तो जेवायला निघाला. तो तिथे पोहोचला तेव्हा तिथे बरीच मंडळी होती. त्यापैकी काहींनी अविनाशची विचारपूस केली. सर्वांनी एकमेकांचा ओळखपरिचय करुन घेतला. सदू सर्वांसाठी ताटं करत होता. तिथे सर्वजण होते मात्र कबीर कुठेच दिसत नव्हता. आणि अविनाशची नजर त्यालाच शोधत होती. शेवटी न राहवून तो सदूपाशी गेला,

'सदू, सर्वजण आले आहेत पण कबीर कुठे दिसत नाही? येणार नव्हता का तो आज?'

'नाही अविनाशदादा! ते उशीराने येतात.' सदू म्हणाला तसं अविनाशने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहीलं.

'पण का?'

'या लोकांना त्यांच वागणं पटत नाही. म्हणून मग ते कबीरदादांसोबत जेवण करणं टाळायला लागले. पण मग नंतर कबीरदादाच उशीराने यायला लागले.' सदू दबक्या आवाजात म्हणाला.

'पण..? बरं! तो आता कुठे आहे?'

'सांगता येणार नाही दादा. पण ते बऱ्याचदा बागेत जात असतात. त्यांना आवडतं तिथे बसायला.'

'बरं! मग मी बघून येतो त्याला.'

'पण तुम्ही जेऊन घ्या आधी. तुम्ही दमलेले आहात.' सदू म्हणाला.

'नको! मी आधी कबीरला बघून येतो. मग आम्ही दोघं सोबतच जेवायला बसू.'

'बरं अविनाशदादा! तुम्ही म्हणाल तसं.'

अविनाश निघायला लागतो, तेवढ्यात..

'पण जर कबीरदादा इथे कुठेच दिसले नाहीत तर मग ते समुद्रकिनारी जाण्याची शक्यता आहे. आपल्या संस्कृतीमंदिराच्या मागच्या बाजूने तिकडे जाण्यासाठी पायवाट आहे. दोन-तीन किलोमीटरवर किनारा लागतो.' सदू म्हणाला.

'बरंबरं! बघतो मी.' असं म्हणून तो कबीरला शोधायला निघाला. संपुर्ण संस्कृतीमंदिरात तो दिसला नाही तेव्हा अविनाशने ती पायवाट धरली, आणि तो समुद्रकिनारी जायला निघाला. दुपारी एकची वेळ होती. सूर्य डोक्यावर आला होता. अशातही अविनाश चालत राहीला. बरंच अंतर चालून गेल्यावर दुरुन किनारा दिसू लागला. तो तसाच चालत राहीला. तेव्हा दुरवर वाळूवर त्याला कबीर बसलेला दिसला. अविनाशने तिथुनच कबीरला मोठ्याने आवाज दिला. ती आरोळी कबीरपर्यंत पोहोचली असावी. त्यानेही मागे वळून अविनाशला तिकडे येण्याचा इशारा केला. तसा अविनाश त्याच्यापर्यंत चालत गेला.

'तू इकडे कसा? कबीरने विचारलं.

'तुला शोधतंच आलोय. सदूने सांगितलं होतं तू इथे बऱ्याचदा येतो असं.'

'हो! ये बस.'

अविनाशही खाली वाळूवर बसला. तिथे त्या दोघांशिवाय कुणीही नव्हतं. त्यात शांततेमुळे दुरवरच्या लाटांचा आवाजही स्पष्टपणे ऐकू येत होता.

'तू इकडे आलाय याचा अर्थ सदूने सर्व काही सांगितलं असेल! हो ना?'

'हो! सांगितलंय त्याने. पण मला यामागचं कारण जाणून घ्यायचंय.'

'कारण? हे असंच आहे अविनाश. माझं दलित वस्तीत जाऊन तिथल्या गरीब मुलांना शिकवणं यांना आवडत नाही. त्यांच्या दृष्टीने मी जे करतो आहे ते धर्माच्या विरुद्ध आहे. माझ्याबरोबर जेवण्यात त्यांना कमीपणा वाटतो. पण मला यात कुठलाही कमीपणा वाटत नाही. हेच कारण आहे आता मी तिथे नसण्यामागचं.' कबीर म्हणाला.

'पण हे फार चुकीचं आहे. मानवतेची सेवा करणं हा प्रत्येकाचा धर्म असतो आणि लहान

मुलांमध्ये तर देव असतो असं म्हणतात. मग हे असं कसं वागू शकतात?'

'असो! ज्याचं त्याचं वागणं ज्याच्यात्याच्याजवळ असतं. मला प्रश्न एकच पडलाय, कि हे विभूतीनारायण गीतेचे महान उपासक आहेत. गीतेतल्या प्रत्येक अध्यायातला प्रत्येक श्लोक ते कुणालाही उत्तम रितीने समजावून सांगू शकतात. त्यानां महाभारताचं त्याचप्रमाणे वेदांचही ज्ञान आहे. आणि भगवान श्रीकृष्णांनी कर्णाला उपदेश करताना म्हणून ठेवलंय कि, या जगात कुणालाही संपत्ती,सन्मान आणि ज्ञानापासून वंचित ठेवणं हे कृत्य धर्माविरुद्ध आहे. असं असेल तर मग भगवान श्रीकृष्णांच्या वचनात आणि यांच्या वागण्यात इतकं वैधर्म्य का असावं?' कबीर कुठेतरी शुन्यात नजर लावून बोलत होता. त्याने विचारलेले प्रश्न थेट त्याच्या अंत:करणातुन येत होते.

'कारण गीता सांगणं किंवा वाचणं खुप सोपंय. पण ती आत्मसात करुन त्याप्रमाणे वागणं खुप अवघड असतं. इतकं ज्ञान मिळवूनसुद्धा यांचे विचार मात्र संकुचितच असतात. त्यांना प्रतिष्ठा आणि सन्मान हवा असतो. अशा ज्ञानाला आपण केवळ पाठांतराचं नाव देऊ शकतो.' अविनाश म्हणाला.

'मुळात माणुसकी नावाचीही गोष्ट जगात असते हेच ते लोकं विसरुन गेले आहेत.' कबीरने अविनाशच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

'असो जाऊ दे तो विषय! तू सांग, इकडे संस्कृतीमंदिरात कसं येणं केलं?' कबीरने विचारलं.

'तसं काही खास कारण नाहीये. मी संन्यासी नसलो तरी संन्याशाचंच जीवन जगत आलोय. त्याचमुळे एका ठिकाणी फार काळ न राहता वेगवेगळया ठिकाणी राहणं मी पसंत करतो. इथे येण्याआधी दोन महीने नागपूरात होतो. रामकृष्ण मठात काही दिवस घालवले. तेव्हाच इथे अर्ज केला होता, इथून सकारात्मक उत्तर मिळालं तेव्हा इथे आलो. आता बघू इथे किती दिवस राहणं होतं ते!'

'मुळात असं जगण्याचं कारण काय अविनाश? तुला आप्त, कुटूंबिय असतीलंच ना?' कबीरने विचारलं.

'आहेत ना! खरंतर ते आहेत कि नाहीत हाच मोठा प्रश्न आहे.'

'म्हणजे?'

'म्हणजे मला प्रतारणा सहन होत नाही कबीर. मला जेव्हा कळालं कि घरच्यांना आता आपल्याविषयी वाटायला हवं तितकं प्रेम, आपुलकी वाटत नाही, तेव्हा मी ते घर सोडायचा निर्णय घेतला. तिथनं गेल्यावर तरी त्यांना आपली किंमत कळेल अशी समजूत होती माझी, पण...'

'पण काय अविनाश?'

'पण माझी तीच समजूत चुकीची होती. मी जाण्याने कुणाला काही फरक पडला नव्हता. सर्व सुखात होते. फरक मात्र फक्त मला पडला होता. त्यानंतर आज इतकी वर्ष झाली पण कुणीही कुणाला शोधण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे त्याच्याबद्दल आता काही सांगणं खुप अवघड आहे. या सगळ्यांत मी चुकलो नव्हतो असं नाही, मुळात माझ्यासकट सर्वचजण चुकले होते. पण त्या गोष्टी आता गौण आहेत, कारण ते सर्व संपलंय आता.'

'मग त्यानंतर?' कबीरने विचारलं.

'त्यानंतरच्या या नऊ वर्षात मी अख्खा देश पालथा घातला. माझं शिक्षण पुर्ण केलं. सर्व ठिकाणी जाऊन राहीलो. लोकांची गरीबी, श्रीमंती पाहीली. तेव्हा कळालं कि या जगात मी एकटा दु:खी नाहीये. प्रत्येकाला कशाचं ना कशाचं दु:ख आहेचं. तेव्हापासून मी फक्त सुख आणि शांततेच्या शोधात आहे. पण या दोन्ही गोष्टी मला आजपर्यंत लाभलेल्या नाहीत. असं का?' अविनाशने विचारलं.

'शांतता! मुळात शांतता ही बाहेर शोधण्याची गोष्ट नाही अविनाश! कारण ती आपल्या मानण्यावर असते. ती आपल्या आत असते.

आता बघ ना, एखाद्या श्रीमंत करोडपती माणसाला रात्रीची शांत झोप लागत नाही, पण तीच शांत झोप एका कष्टकरी गरीब शेतकऱ्याला त्याच्या झोपडीत लाभते. याचाच अर्थ काय तर शांतता ही पैशाने विकत घेता येण्यासारखी गोष्ट नाही. त्याचबरोबर ती कुठे बाहेर शोधण्याचीही गरज नसते. मुळात ती आत असावी लागते. ती आतली गोष्ट तू आयुष्यभर बाहेर शोधत आला आहेस. कशी लाभेल? बघ विचार कर यावर..

दु:खाचं म्हणशील तर, मानवाला दु:ख मिळण्याचं एक प्रमुख कारण म्हणजे त्याच्या अवास्तव अपेक्षा. जितक्या जास्त अपेक्षा तितके जास्त दु:ख, त्याचप्रमाणे जितक्या कमी अपेक्षा तितके कमी दु:ख. अपेक्षा करणं, ती भंग होणं आणि त्याबरोबर दु:ख येणं ह्या एकमेकांना पूरक अशा गोष्टी आहेत. अपेक्षा ठेवली कि या बाकी गोष्टी येणारच. त्यामुळे आत्मिक शांतता मिळवणं आणि अपेक्षांचा त्याग करणं या दोन गोष्टी चांगलं आयुष्य जगण्यासाठी पुरेशा आहेत. अर्थात चांगल्या आयुष्याचा अर्थ प्रत्येकाच्या दृष्टीने वेगवेगळा असतो.' कबीर म्हणाला.

'याचा अर्थ घर सोडल्यानंतरसुद्धा मी कुटूंबियांकडुन ज्या अपेक्षा ठेवल्या होत्या, त्याच माझ्या दु:खाचं कारण बनल्या होत्या.' अविनाश म्हणाला.

"हो अविनाश! कोणी काहीही म्हंटलं तरी हेच सत्य आहे.'

अविनाश निर्विकार होऊन समोरच्या लाटांकडे पाहात होता. तो निशब्द असला तरी त्याच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. त्याला इतक्या दिवसांपासून पडलेल्या प्रश्नांचं उत्तर कबीरने एका झटक्यात देऊन टाकलं होतं. तेवढ्यात कबीरने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

'आता आपल्या निघायला हवं मित्रा.'

अविनाशने त्याच्याकडे पाहीलं आणि दोघे उठले. कपडे झटकून दोघे मित्र संस्कृतीमंदिराच्या दिशेने निघाले.

'या कबीरदादा, अविनाशदादा! बसा, जेवण करुन घ्या.' सदू म्हणाला.

'हो हो! ये बस अविनाश.' असं म्हणत कबीरने दोन चटया अंथरल्या आणि दोघं मित्र जेवणाला बसली.

ते जेवत असताना तिथे कसलीतरी तयारी सुरु होती. जेवताना कुणीही कुणाशी फार बोललं नाही.

'आज रात्री इथे कसलातरी कार्यक्रम आहे असं दिसतंय.' जेवण झाल्यानंतर अविनाश म्हणाला.

'कार्यक्रम असा नाहीये. पण हल्ली रोज रात्री इथे अभंग म्हंटली जात आहेत. मी नसलोतरी तू जा त्या अभंगांना.'

'मी नसलोतरी म्हणजे? तुला आवडत नाहीत अभंग?' अविनाशने विचारलं.

'आवडत नाही असं नाहीये. अभंग ऐकायला कुणाला नाही आवडणार, पण आजकाल मन अस्वस्थ असतं. मुळात संस्कृती नक्की कशात असते हाच मोठा प्रश्न मला पडलाय.' कबीर म्हणाला.

'म्हणजे?'

'म्हणजे बघ ना, आपण सर्वजण इथे येऊन ज्ञान मिळवतोय, नि:संकोच आपल्या ज्ञानात भर पडतेय. आणि आत्मिक शुद्धतेसाठी ते गरजेचंपण आहे. पण अशा ज्ञानाचा समाजाला काय उपयोग? समाजातल्या दुर्लक्षित झालेल्या, अन्याय झालेल्यांसाठी आपण काय करतोय? विवेकानंदांनीही सांगून ठेवलंय, एखाद्या ज्ञानी मनुष्याने जर स्व:ताला आयुष्यभर एका खोलीत बंद करुन ठेवलं, तर त्याच्या त्या ज्ञानाचा काय उपयोग? त्याने त्या ज्ञानाचा उपयोग करुन जर दिनदुबळयांचा उद्धार केला तरचं त्या ज्ञानाला अर्थ येईल.'

'अगदी बरोबर आहे. पण मुळात जे दिनदुबळयांचा उद्धार करु शकतात, तेच जर काही करत नसतील तर मग आपण तरी काय करणार? म्हणजे आपल्याकडे ना पैसा ना काही! आपल्याला आपलंच पडलंय, तेव्हा...'

'खरंतर कुणाचा उद्धार करण्यासाठी वेगळ्या क्षमतेची गरजच नसते. कारण क्षमता ही प्रत्येकात असतेच. त्यापेक्षा महत्वाची गोष्ट असते इच्छा. जर इच्छा असली तर सर्वकाही होतं. मी परंपरांच्या विरोधात नाहीये. पण आंधळेपणाने परंपरा मानणाऱ्यांचा मला राग येतो. काळाप्रमाणे सर्वांनी बदलायला हवं. अन्नाच्या भुकेलेल्याला उपदेश करुन काय फायदा? त्यासाठी त्याचं पोट भरलेलं असणं गरजेचं असतं. आपल्या देशातल्या समस्या गंभीर आहेत अविनाश. गरीब माणूस गरीबीमुळे आणि अज्ञानामुळे सत्ताधारी, उच्चवर्गीयांकडून पिळवटला जातोय. देवस्थानांना करोडोचं दान देणारे गरीबांसाठी काय करताहेत? विवेकानंदांनीही सांगून ठेवलंय, जो चालत्या बोलत्या माणसातला देव पाहू शकत नाही, तो दगडातला देव काय पाहणार! आपल्याला जगन्मातेने जन्म दिला असं म्हटलं जातं, मग कुठली आई आपल्या मुलांना उपाशी ठेऊन जेवू शकेल? हे तिला तरी आवडेल का?' कबीरने विचारलं.

'नाही आवडणार. कसं आवडेल! खरंतर मलाही आंधळेपणाने परंपरा मानणं आवडत नाही,

पण...'

'काही दिवसांपूर्वी चंदनपूरातले विश्वासराव भोसले संस्कृतीमंदिरात आले होते. त्यांना सर्वजण आण्णा म्हणतात. पण त्यांची समस्या दुर करण्याऐवजी इथल्या सर्वांनीच अंग काढून घेतलं होतं, आणि तेच मला आवडलेलं नाहीये.' अविनाशचं वाक्य मधेच थांबवत कबीर म्हणाला.

'हो पण त्यांची समस्या काय होती?' अविनाशने विचारलं.

'ते गावातले मोठे बागायतदार आहेत. मोठमोठ्या लोकांसोबत उठणंबसणं असतं त्यांचं. पण त्यांना सध्या वेगळीच समस्या सतावते आहे. चंदनपूर हे अडिच-तीनशे लोकवस्ती असलेलं गाव आहे. गावातले सर्व शेतकरी सधन आहेत, त्याचबरोबर आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्याचे गृहमंत्री बबनराव पाटील यांच नाव तू ऐकलं असेलच!'

'हो ऐकलंय! पण त्यांच काय?'

'त्यांनी आपल्या गावाशेजारीच एक साखर कारखाना उभारायचं ठरवलंय. कोकणात साखर कारखान्यांची कमतरता आहे म्हणून हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी यापूर्वीच पत्रकार परिषदेत सांगितलंय.' कबीर म्हणाला.

'पण ही तर चांगली गोष्ट आहे. कारखाना उभारला गेला तर रोजगार निर्मितीही होईलच ना!'

'अर्थात चांगली गोष्ट आहे. रोजगार निर्मिती झाली तर कुणाला नाही आवडणार! पण ज्या जागेवर त्यांनी हा प्रकल्प उभारायचं ठरवलंय, त्या सर्व चंदनपूरातल्या शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत.' कबीर म्हणाला.

'आणि त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी द्यायच्या नाहीयेत. होय ना?' अविनाशने विचारलं.

'अगदी बरोबर! पंधरा दिवसांपूर्वी तसा प्रस्ताव बबनरावांचे लहान भाऊ म्हणजे अभय पाटील यांनी गावकऱ्यांसमोर ठेवला होता.'

'मग त्यांनी काय केलं?'

'त्यांनी प्रस्तावाला सरळ नकार दिला होता. पण हा विषय इथेच मिटत नाहीये अविनाश. त्यानंतर दोन दिवसांनी ते पुन्हा वस्तीवर गेले होते, आता त्यांनी एक नवीन प्रस्ताव

गावकऱ्यांसमोर ठेवलाय. जमिनीला बाजारभावापेक्षा जास्त रक्कम देण्याची, त्याचबरोबर त्या शेतकऱ्यांच्या मुलांना कारखान्यात नोकरी द्यायची हमी त्यांनी सर्वांना दिली आहे. आणि आण्णा गावातले वयस्कर, प्रतिष्ठीत व्यक्ती असल्याकारणाने सर्वजण त्यांचा सल्ला ऐकतात. माझ्याही ते चांगल्या परिचयाचे आहेत. पण...'

'पण काय?'

'पण सध्या तेच संभ्रमात आहेत. त्यांनाच कुणाच्या तरी चांगल्या सल्ल्याची गरज आहे. खरंतर त्यासाठीच ते संस्कृतिमंदिरात आले होते. या संस्थेचे अध्यक्ष संजय निकम एक नावाजलेले वकिल आहेत, त्याचबरोबर इथल्या विद्वान मंडळीचा आपल्याला सल्ला मिळेल अशी त्यांची धारणा होती. पण त्या सर्वांनीच त्यांना जमीन देऊन टाकण्याचा सल्ला मला फारसा पटलेला नव्हता, माझ्या अंदाजानुसार त्यांनाही तो फारसा पटलेला नसावा. याबाबतीत तुला काय वाटतं?' कबीरने विचारलं.

'खरंतर सांगणं अवघड आहे. पण फक्त पुर्वानुमानावरुन अंदाज बांधून त्या व्यक्तीला अयोग्य ठरवणं बरोबर नाहीये कबीर. बबनराव पाटलांच्या मनातला उद्देश चांगला असू शकतो किंवा नसूही शकतो. पण मी कायद्याचा अभ्यास केलाय त्यामुळे कुठल्याही निर्णयापर्यंत पोचण्यासाठी दोन्ही बाजू पडताळून पाहणं आवश्यक आहे असं मला वाटतं.'

'पडताळून पाहणं खरंच आवश्यक आहे! पण..'

'त्यासाठी त्यांना भेटणं, त्यांच्याशी बोलणं गरजेचं आहे.' कबीरचं वाक्य मध्येच थांबवत अविनाश म्हणाला.

'तसं असेल तर मग उद्याच आपण त्यांना भेटायला जाऊ!'

'उद्याच?'

'हो!' कबीर म्हणाला.

'बरं ठिक आहे. आपण नक्की जाऊ! पण तू यात जास्त पडू नये असं मला वाटतं.' अविनाश म्हणाला.

'पण का?'

'राजकारण म्हणजे चिखल असतो कबीर. यात विकृत मानसिकता असणाऱ्यांची कमी नाही. त्यामुळे त्यांच्यापासून चार हात लांब राहीलेलंच बरं असतं असं मला वाटतं.' अविनाश म्हणाला.

'तुझं म्हणणं कदाचित बरोबर असेल! पण त्याचबरोबर इथे संस्कृतिमंदिरात इतकं ज्ञान मिळवूनसुद्धा आयुष्याचं डबकं होऊन बसलंय, आयुष्याला प्रवाहात आणण्यासाठी हे करणं गरजेचं आहे असंही मला वाटतं. आणि एखादं चांगलं ध्येय मनाशी धरुन कार्य करत राहीलो तर त्यामध्ये येणारे अडथळे देव स्वत: दुर करत असतो असं सज्जनांनी म्हणून ठेवलंय. तेव्हा कशाची फिकीर?'

'तू मला पुन्हा निशब्द केलं आहेस मित्रा!' अविनाश म्हणाला.

अविनाश निशब्द असला तरी त्याच्या मनात विचारांच वादळ उठलं होतं. कबीरने त्याचं मत खोडून काढलं होतं याचा त्याला राग आला नव्हता. उलट त्याला त्याचा अभिमान वाटत होता. जणूकाही त्याच्या सुप्त मनाला कबीरकडून हीच अपेक्षा होती.

'तू इथलं कलादालन बघितलं आहेस?' कबीरने विचारलं तशी अविनाशने नकारार्थी मान हलविली.

'चल मग! तुला आज इथलं संस्कृति कलादालन दाखवतो. खूप सुंदर गोष्टी आहेत तिथे.' असं म्हणत तो अविनाशला कलादालनात घेऊन गेला.

रात्री जेवणानंतर अभंगांचा कार्यक्रम होणार होता. तिथे अविनाशच्या आग्रहामुळे कबीरपण उपस्थित होता. रात्री बारा वाजेच्या सुमारास कार्यक्रम संपला, तेव्हा सगळे आपापल्या खोलीत जाऊन झोपून गेले.

रात्रीचे साडेबारा वाजले होते. दिवसभर गजबज असलेल्या संस्कृतिमंदिराच्या आवारात आता स्मशानशांतता पसरली होती. त्याचबरोबर लख्ख काळोखही पसरला होता. सूर्य केव्हाच अस्ताला गेला होता. ज्याप्रमाणे पुनर्निर्मितिसाठी विनाश महत्वाचा असतो, जन्मासाठी मृत्यू आवश्यक असतो. त्याचप्रमाणे उदयासाठी अस्ताला जाणंही तितकच महत्वाचं असतं ही शिकवण देऊन तो गेला होता. उद्या पुन्हा एक नवीन पहाट घेऊन येईल याची खात्री देऊन तो गेला होता.

सकाळी ठरल्याप्रमाणे दोघंजण लवकर उठून तयार झाले.

'चल अविनाश! आपल्याला निघायला हवं. आण्णांच तालुक्याला काही काम असेल तर ते निघून जातील, त्यापेक्षा आपण लवकर गेलेलं बरं.'

'हो हो, चल!' म्हणत अविनाशने त्याच्या खोलीला कडी लावली. आणि ते दोघंजण निघाले. आधी उल्लेख केल्याप्रमाणे संस्कृतिमंदिरापासून चंदनपूर फार लांब नव्हतं. पण प्रवासी मिळत नसल्याने त्याचबरोबर रस्ताही कच्चा असल्याने गाड्या या मार्गाने येत नसत, त्यामुळे त्यांना पायी जाणं गरजेचं होतं.

'तू माझ्याबद्दल सर्वकाही जाणून घेतलंस कबीर. आता मला तुझ्याबद्दल सांग! तुझे कुटूंबिय कुठे असतात? इथे कधी आलास?' चालत असतानाच अविनाशने कबीरला प्रश्न केला.

'कुटूंबिय? मला ज्यांनी जन्म दिला त्यांच्याबद्दल मी फार काही सांगू नाही शकणार. पण ज्यांनी मला सांभाळलं त्या माझ्या माईआबांना मी अकरा महिन्यांचा असताना उकिरड्यावर सापडलो होतो. त्यांनाही मुलबाळ नसल्यामुळे ते मला घरी घेऊन आले. आता माईआबा दोघेही नाहीयेत. मी वीस वर्षांचा असताना आबांना ह्रदयविकाराचा झटका आला. ते गेल्यावर मग माईही फार नाही जगल्या.'

अविनाश कबीरचं बोलणं लक्षपुर्वक ऐकत होता. भेटल्यापासून पहिल्यांदाच त्याला कबीरबद्दल सहानुभूती वाटू लागली होती. पण त्याचबरोबर कबीरला सहानुभूतीची गरज नाहीये हेही त्याला ठाऊक होतं.

'त्यानंतर तू इथे आलास?' अविनाशने विचारलं.

'नाही! शिक्षण पूर्ण झाल्यावर मी काही वर्ष नोकरी केली. एका खाजगी शाळेत शिक्षकाचं काम मी करत होतो. पण फक्त त्या चार पैशांसाठी आयुष्य रेटत राहणं मनाला पटत नव्हतं. मन अस्वस्थ व्हायला लागलं तेव्हा मी इथे आलो.' कबीर म्हणाला.

'बरं! पण मग पुढे काय?'

'पुढे काय?'

'स्वत:चंही एक कुटूंब असावं असं नाही वाटत तुला?' अविनाशने विचारलं.

'वाटायचं आधी! पण आता नाही वाटत.'

'का? कोणी मुलगी सोडुन...'

'सोडुन वैगेरे नाही गेलंय कोणी. खरंतर आम्ही दोघांनी संमतीने दुर जाण्याचा निर्णय घेतला होता.' अविनाशचं वाक्य मध्येच थांबवत कबीर म्हणाला.

'दुर जाण्याचा निर्णय?' अविनाशने विचारलं.

'हो! आमच्या कुठल्याच गोष्टी जुळून येत नव्हत्या. पुढे जाऊन तिच्या घरच्यांचा विरोध पत्करावा लागणारच होता. त्यामुळे सर्व परिस्थिती बिघडण्याआधीच आम्ही दुर होण्याचा निर्णय घेतला होता.' कबीर म्हणाला.

'अरे पण कदाचित सर्व ठिक झालं असतं! तुम्ही घाई केली होती असं नाही वाटत तुला?'

'जातपात मानणारे लोकं आपल्या देशात अजून आहेत अविनाश.'

'पण तरी..'

'पण सध्याची परिस्थिती पाहता आम्ही घेतलेला निर्णय योग्य होता असंच म्हणेन मी.'

अविनाशचं बोलणं मध्येच थांबवत कबीर म्हणाला.

'पण ही गोष्ट तुमच्या आयुष्याशी निगडीत होती.'

'कुणाला तरी दुखवून सुख मिळवण्यात काय अर्थ आहे अविनाश? मुळात पळून जाऊन सुख मिळतंय का, हाच मोठा प्रश्न आहे. त्यानंतर आयुष्यात सर्वकाही मिळालं तरी एक सल मनात कायम राहते. काही लोकं आयुष्यभरासाठी दुखावले जाण्यापेक्षा ते दु:ख आम्ही दोघांनी थोडं थोडं वाटून घेतलं होतं.' कबीर म्हणाला.

'पण सुख मिळवण्याचा अधिकार प्रत्येकाला असतो असं नाही वाटत तुला?'

'नाही! सुख किंवा आनंद हा प्रकार आपल्या मानण्यावर असतो. आयुष्यात हवंय ते मिळवणंच सर्व काही नसतं अविनाश. कधीकधी एखादी गोष्ट मिळवण्याच्या प्रयत्नात सर्व काही सुटून जात असतं.

'याचा अर्थ पळुन जाऊन लग्न करणाऱ्यांच्या विरोधात आहेस तू?' अविनाशने विचारलं.

'त्यांच्या विरोधात जाणारा मी कोण? मी फक्त त्यांच्या निर्णयाच्या विरोधात आहे. घरच्यांचा विरोध पत्करुन पळून जाऊन लग्न करणाऱ्या किती जणांचा संसार टिकलाय? विचार कर, तुझं तुलाच उत्तर मिळेल!

बागेतलं एखादं सुंदर फुल आपल्याला छान वाटतं म्हणून ते तोडून आपण आपल्या घरी घेऊन येतो.

त्या फुलावर आपलं प्रेम आहे असं आपण समजतो. त्याला तोडून आपण त्याचं आयुष्य कमी करतोय, त्याच्या कुटूंबापासुन त्याला दुर करतोय, तोडल्यानंतर काही तासातच ते फुल कोमेजून जाईल हे सर्व माहीत असुनसूद्धा आपण त्याला तोडतो, कारण माणूस स्वार्थी आहे अविनाश. त्याला सर्वकाही स्वत:जवळ हवं असतं. पण असं वागताना कुणी दुखावलं गेलं तरी त्याला त्याची पर्वा नसते.' कबीर म्हणाला.

'पण फुलांमुळे मानवाला आनंद मिळत असतो, मग यात गैर काय? आणि जर हे प्रेम नसेल तर मग प्रेम नक्की आहे तरी काय?' अविनाशने विचारलं.

'समोरच्याचं हित कशात आहे हे जाणून घेऊन कृती करण्यालाच प्रेम म्हणतात. प्रेमाचा खरा अर्थ त्यागात असतो.

फुलांबद्दल काय वाटतं हे जाऊन त्या माळ्याला विचार अविनाश, ज्याने त्या झाडांना वाढवलंय. त्यांना लहानाचं मोठं केलंय. त्याला त्या फुलांचं हित कशात आहे हे ठाऊक असतं. त्या फुलांना तोडून त्याला आनंद कधीच नाही मिळणार, याउलट त्यांना झाडावर हसताना बघून त्याला आत्मिक आनंद मिळेल. यालाच आपण प्रेम म्हणू शकतो. मीही थोड्याफार फरकाने तेच केलंय.' कबीर म्हणाला.

'तुला समजून घेणं खरच खुप अवघड आहे कबीर! यावर काय बोलावं खरच समजत नाहीये.'

'ते इतकंही अवघड नाहीये मित्रा. अजून काही दिवस सोबत राहिलास तर मला नक्की समजू शकशील.' कबीर म्हणाला तसे दोघंजण एकमेकांकडे पाहून स्मित करु लागले. ते आता गावापासून फक्त पाच मिनीटांच्या अंतरावर होते. ते चालत असले तरी अविनाशच्या विचारांची तंद्री लागली होती. तो विचार करत होता, आजच्या काळात मनातल्या कुठल्यातरी

विकृत भावनेला प्रेमाचं नाव देणारे कितीतरी अंकुर पंवार समाजात खुलेआम फिरत आहेत. मुलांमुलींसाठी नकार पचवणं इतकं अवघड होऊन बसलंय. अशात कबीर इतका मोठा त्याग कसा करु शकतो? यालाच निरपेक्ष प्रेम म्हणतात का?

कबीरच्या आवाजाने त्याची विचारांची तंद्री तुटली.

'अविनाश..'

'अं?'

'आपण गावात आलोय मित्रा! कसला विचार करतोय?' कबीरने विचारलं.

'काही नाही, असंच!' अविनाश म्हणाला.

'तो समोर आण्णांचा वाडा आहे. आपल्याला तिथेच जायचंय!' कबीर म्हणाला तसे ते दोघं वाड्यापाशी आले. खाली पायरीजवळच एक लहान मुलगा खेळत होता. तो त्यांचा नातू असावा असा अंदाज बांधून कबीरने त्याला विचारले,

'आजोबा घरी आहेत का बाळा?' कबीरने असं विचारताच तो मुलगा काहीही न बोलता घरात पळत गेला. कबीर आणि अविनाश काहीही न समजल्यासारखे एकमेकांकडे पाहात होते. आणि तेवढ्यात आतून एक पासष्ठ वर्षांचे गृहस्थ बाहेर आले. त्यांनी त्यांच्या कोटातून चष्मा बाहेर काढला. चष्मा लावल्यावर ते दोघांना नीट निरखून पाहात होते.

'कबीर?' आण्णांनी विचारलं.

'हो आण्णा! कसे आहात?' कबीरने विचारलं.

'मला काय होतंय म्हाताऱ्याला! पण तू इकडे कसा?'

'तुम्हालाच भेटायला आलोय. हा अविनाश आहे. याने वकिलीचा अभ्यास केलाय. तुम्ही मागे म्हणाला होतात ना...'

'हो हो, या बसा!' कबीरचं वाक्य मध्येच थांबवत आण्णा म्हणाले.

आण्णा वळाले आणि तिथे व्हराड्यांतच एका खुर्चीवर बसले. त्यांच्या समोर अजून दोन खुर्च्या होत्या, त्यावर अविनाश आणि कबीर जाऊन बसले.

'सुनबाई तीन चहा टाका!' आण्णांनी तिथुनच सुनेला आवाज दिला.

'हं बोला!' ते या दोघांकडे बघत म्हणाले.

'संस्थाध्यक्षांचा सल्ला तुम्हालाही पटलेला नव्हता असं मला वाटलं होतं, म्हणून मी अविनाशला इथे घेऊन आलोय.' कबीर आण्णांना म्हणाला.

'सल्ला तर पटला नव्हताच. मुळात ही वडिलोपार्जित जमीन आहे. आमचं सगळं आयुष्य इथेच गेलंय. आमची मुलं, नातवंड इथेच वाढले आहेत. नातेवाईकांचा सर्व गोतावळा इथे आहे. तेव्हा गाव सोडून जाणार कुठे? आणि का?' आण्णा म्हणाले.

'याचा अर्थ तुम्ही त्यांचा प्रस्ताव नाकारला असेल. होय ना?' अविनाशने विचारलं.

आण्णा काहीच बोलले नाही, ते उठले आणि समोर गॅलरीत जाऊन उभे राहीले. तिथे हात ठेऊन ते कसलातरी विचार करत होते. कबीर आणि अविनाश दोघेही एकमेकांकडे गोँधळल्यासारखे पाहत होते.

'आण्णा काय झालंय?' कबीरने न राहवून विचारलं.

'तू पंढरी पाटलाला ओळखतोस?' आण्णांनी कबीरकडे वळत विचारले.

कबीरने नकारार्थी मान हलविली.

'चंदनपूरात त्याची आणि त्याच्या भावाची मिळून एकूण पंधरा एकर शेती आहे. परवाच्या दिवशी रात्री नऊ वाजता घरी येताना काही गुंडांनी त्यांना मारहाण केली होती. त्यांना कसल्यातरी कागदपत्रांवर यांच्या सह्या हव्या होत्या, असं त्या दोघांचंही म्हणणं आहे. पण या दोघांनी नकार दिल्यावर मग त्यांना मारहाण केली गेली.

ती माणसं बबनराव पाटलांची होती असं त्या दोघांनाही वाटतंय. खरं काय खोटं काय समजेनासं झालंय.' आण्णा म्हणाले.

'ते खोटं बोलताय असं वाटतंय का तुम्हाला?'

'तसं नाही कबीर! पण बबनराव पाटील आपल्या जिल्ह्यातले तसेच राज्यातले फार मोठे गृहस्थ आहेत. त्यामुळे त्यांचे विरोधकही फार आहेत. पंढरी खोटं बोलत नसेलही, पण मंत्रीसाहेबांची बदनामी करण्यासाठी कोणी हे कृत्य केलं नसेल असं तरी कशावरुन म्हणायचं?' अण्णांनी

विचारलं.

'तुमचं मंत्रीसाहेबांशी याविषयी काही बोलणं...'

'नाही! त्यांना तसं थेट विचारणं बरं नाही दिसणार. आणि तसेही ते सध्या मुंबईत आहेत.' अविनाशचं बोलणं मध्येच थांबवत आण्णा म्हणाले.

'ते जाऊ द्या आण्णा! तुम्हाला काय वाटतंय ते महत्वाचं आहे!' कबीर म्हणाला.

'मला फक्त सत्य जाणून घ्यायचंय, आणि जर पंढरी खरं बोलत असेल तर...' आण्णा बोलता बोलता थांबले.

'तर काय?'

'तसं असेल तर तो ही जमीन मिळवण्यासाठी काहीही करु शकतो.' आण्णा म्हणाले.

'आणि तसं खरंच असेल तर?' कबीरने विचारलं तसे आण्णा संभ्रमात पडल्यासारखे त्याच्याकडे पाहु लागले.

'आपल्याला काहीतरी पाऊल उचलावच लागेल आण्णा! नाहीतर उद्या अजून कोणावर तरी हल्ला होईल.' अविनाश म्हणाला.

आण्णा दोघांचं बोलणं शांततेत ऐकत होते.

'हवं तर आम्ही त्या पंढरी दादांशी बोलून पाहतो!' कबीर म्हणाला.

"तुम्ही जरुर बोला! पण तुला माझं एक काम करावं लागेल कबीर!'

'बोला ना आण्णा!'

'तू परवा मंत्रीसाहेबांना श्रीवर्धनला जाऊन भेट. सर्वांचा नकार तू त्याला सांगावास असं मला वाटतंय.'

'पण आण्णा..'

'तो परवा श्रीवर्धनला येतोय. म्हणून तू श्रीवर्धनला जा आणि भेट त्याला. मी फोनवर तसं बोलून घेईल त्यांच्याशी. खरंतर मीच जाणार होतो पण माझ्या ऐवजी तू जा!' आण्णा म्हणाले.

कबीरने खूप विचार केला पण अखेर तो जायला तयार झाला.

'ठिक आहे, मी जाईन. पण ते माझं ऐकतील असं खरंच वाटतंय तुम्हाला?' कबीरने विचारलं.

'मी काहीच सांगू नाही शकत. पण तू त्यांना जास्त चांगल्या रितीने समजावून सांगू शकतोस असं मला वाटतंय.' आण्णा म्हणाले.

'बरं आण्णा! तसं असेल तर मी नक्की जाईन! आता आम्ही निघतो. जाता जाता त्या पंढरीदादांना भेटून घेतो.' कबीर म्हणाला तसे ते दोघे निघाले. आण्णांनी घर दाखवण्यासाठी त्यांच्या नातवाला दोघांसोबत पाठवलं.

आता ते दोघं पंढरी पाटलांच्या घरासमोर उभे होते. तो लहान मुलगा निघून गेला होता. विचारल्यावर कळालं कि पंढरीनाथ घरीच होते. ते आत गेले तेव्हा समोरच सोफ्यावर पंढरीनाथ आराम करत होते. त्यांच्या पत्नींनी त्यांना आमच्या येण्याविषयी सांगितलं तसे ते उठून बसले. त्यांना बऱ्याच ठिकाणी मार लागलेला दिसत होता.

'नमस्कार, मी कबीर आणि हा अविनाश!'

'नमस्कार!  या बसा ना!'  पंढरीनाथ म्हणाले तसे ते दोघे समोरच दोन खुर्च्यांवर बसले.

'आम्ही तुम्हाला अशा परिस्थितीत त्रास देतोय. पण आम्ही आण्णांकडे आलो होतो म्हणून..' कबीर म्हणाला.

'अहो नाही, त्यात काय एवढं! विचारा तुम्हाला जे विचारायचंय ते!'

'आम्हाला फक्त त्या दिवशी नक्की झालं काय होतं ते जाणून घ्यायचंय.' अविनाश म्हणाला.

'रात्री नऊ-साडेनऊची वेळ असेल ती. रामदास आणि मी गाडीवरुन घराकडे येत होतो. तेव्हा अचानक एका जीपने आमचा रस्ता अडवला. त्यातून काही माणसं उतरली. असतील तीन-चार जणं. ते आम्हाला जमिनी विषयी विचारणा करत होते. तेव्हा रामदास त्यांच्यावर चिडला. आम्ही विरोध करतोय असं पाहुन मग त्यांनी मारहाण सुरु केली. ते सर्वजण पूर्ण तयारीत आले होते, त्यामुळे आम्ही काहीच नाही करु शकलो.' पंढरीनाथ म्हणाले.

'पण ती मंत्रीसाहेबांचीच माणसं होती असं तुम्ही कशावरुन म्हणताय?' कबीरने विचारलं.

'कारण त्यांच्यातल्या एका जणाला मी मागच्या आठवड्यातही पाहीलं होतं. जेव्हा अभय पाटील गावात आले होते, तेव्हा तो त्यांच्यासोबतच होता. त्याचा चेहरा मी नाही विसरु

शकत.' पंढरीनाथ म्हणाले.

'अच्छा! याचा अर्थ ती माणसं खरच त्यांचीच होती!' अविनाश म्हणाला.

'होय अविनाश! मी आण्णांना कालपासून हेच सांगण्याचा प्रयत्न करतोय पण...'

'मी समजू शकतो. आण्णांनी कबीरला परवा तालुक्याला जायला लावलंय. तुमच्या सर्वांचा नकार कळविण्यासाठी.' अविनाश पंढरीनाथांचं बोलणं थांबवत म्हणाला.

'हे चांगलं केलं आण्णांनी! स्पष्ट बोलल्याने प्रश्न सुटत असतात.' पंढरीनाथ म्हणाले.

'ते चार जणं आले होते ती गाडी कोणती म्हणालात तुम्ही?' कबीरने पंढरीनाथांना विचारलं.

'ती एक हिरव्या रंगाची जिप्सी होती.'

'बरं! धन्यवाद वेळ दिल्याबद्दल! आता निघतो आम्ही.' असं म्हणत कबीरने अविनाशकडे पाहीलं आणि ते दोघे निघाले.

दुसरा दिवस असाच गेला.

अखेर तो दिवस उजाडला, ज्या दिवशी त्याला श्रीवर्धनला जायचं होतं. सकाळी नऊच्या सुमारास तो संस्कृतिमंदिरातून निघाला. तिथून त्याला चंदनपूरात येणं गरजेचं होतं. तो चालत चालत चंदनपूरातल्या बस स्टँडपर्यंत आला. ऊन बरच असल्यामुळे तो तिथल्याच एका बाकावर बसला. वीसेक मिनिटं वाट बघितल्या नंतर एक बस आली. चार-पाच प्रवांशां सोबत कबीरही आत जाऊन बसला. जवळपास दिड तासांचा प्रवास असल्याकारणाने तो आत निवांत बसला. खिडकीजवळच्या सीटवर बसून तो निसर्गाचा आनंद घेत होता. दिड तासाने बस श्रीवर्धनला पोहोचली. सर्व प्रवांशांसोबत कबीरही खाली उतरला. सोमवारचा दिवस असल्याकारणाने बसस्टँडवर फारशी गर्दी नव्हती. सकाळचे अकरा वाजून गेले होते. मंत्रीसाहेबांच्या घराचा पत्ता त्याला ठाऊक होता. त्यामुळे तो तिकडे जाणाऱ्या एखाद्या रिक्षेचा शोध घेऊ लागला. अखेर एकजण तिकडे जायला तयार झाला तसा कबीर त्याच्या रिक्षात जाऊन बसला, व ती रिक्षा मंत्रीसाहेबांच्या घराच्या दिशेने निघाली.

दरम्यानच्या वेळात त्याच्या मनात शहराबद्दल अनेक विचार येत होते. कधीकाळी तोही याच शहराचा एक भाग होता. पण त्या गोष्टीनंतर आता अनेक वर्ष उलटून गेली होती. पण इतक्या वर्षांनंतरसुद्धा त्याला शहरात बदल असा काहीच जाणवत नव्हता. सर्वजण अजुनही भेदरलेले,

घाबरलेले दिसत होते. कुणाला कामाच्या ठिकाणी बॉस ओरडेल याची भिती वाटत होती. तर काहींना कोणीतरी सोडून जाईल याची भिती वाटत होती.

काहीजण नशेच्या आहारी गेले होते. पण या सर्वांमध्ये एक समान गोष्ट होती, ते सर्व दु:खी होते. काहीजण भूतकाळात घडलेल्या वाईट गोष्टींचा विचार करुन दु:खी होते, तर काहींना आपलं भविष्यात कसं होईल याची चिंता सतावत होती. खरंतर माणुस ना भूतकाळात जगत असतो, ना भविष्यात. तो वर्तमानात जगत असतो. अर्थात वर्तमान म्हणजेच जीवन असतं. पण तरीसुद्धा तो या दोन्हींचा इतका विचार करुन दु:खी का होतो असा प्रश्न कबीरला पडला होता. आणि अचानक त्याच्या गालांवरुन मंद झुळूक गेली. या शहराने त्याला अजून एक अमुल्य भेट दिली होती. तीच ती, स्मृतिका! त्या गोष्टीनंतरही आता बरीच वर्ष उलटून गेली होती. जेव्हा त्याने तिला पहील्यांदा शाळेत पाहीलं होतं. तो ज्या शाळेत शिकवण्याचं काम करत होता, त्याच शाळेत ती नव्याने रुजू झाली होती. नंतर बोलणं वाढत गेलं, भेटी वाढत गेल्या. दोघंजण एकमेकांना पसंत करु लागले. पण ती मनातली गोष्ट सांगण्याची कोणाचीही हिंमत होत नव्हती. अखेर त्याच्या आडमुठेपणामुळे अथवा भितीमुळे तिला माघार घ्यावी लागली. आणि तो दिवस उजाडला, ज्या दिवशी तिने त्याला तिच्या मनातली गोष्ट सांगितली. सगळं बोलून झाल्यानंतरचं तिचं रडणंसूद्धा कबीरला आता आठवत होतं. ती घाबरली होती, आपल्या हातून काहीतरी भयंकर चूक झालीये असं तिला वाटत होतं. पण मग ती तिची चुक नव्हती हे त्यानेच तिला सांगितलं होतं. खरंतर तिने त्याला जे सांगितलं होतं त्याचीच तो इतके दिवस उजळणी करत आला होता. पण अखेर बोलण्याची हिंमत तिने आधी दाखवली होती. कारण त्याला स्वत:चे शब्दच सापडत नव्हते. त्याचमुळे त्याने प्रसिद्ध गझलकार दुष्यंत कुमार यांची एक गझल तिला सांगण्यासाठी निवडून ठेवली होती. तिच गझल त्याला आता आठवत होती.

मैं जिसे ओढ़ता-बिछाता हूँ

वो ग़ज़ल आपको सुनाता हूँ

एक जंगल है तेरी आँखों में

मैं जहाँ राह भूल जाता हूँ

तू किसी रेल-सी गुज़रती है

मैं किसी पुल-सा थरथराता हूँ

हर तरफ़ ऐतराज़ होता है

मैं अगर रौशनी में आता हूँ

एक बाज़ू उखड़ गया जबसे

और ज़्यादा वज़न उठाता हूँ

मैं तुझे भूलने की कोशिश में

आज कितने क़रीब पाता हूँ

कौन ये फ़ासला निभाएगा

मैं फ़रिश्ता हूँ सच बताता हूँ

कबीरच्या विचारांची तंद्री लागली होती. तेवढ्यात त्याला उतरायचं होतं ते ठिकाण आल्यामुळे रिक्षावाल्याने त्याला आवाज दिला.

'भैय्या!'

'हो!' असं म्हणत तो खाली उतरला.

'हे घे पैसे' म्हणत त्याने वीस रुपये रिक्षावाल्याच्या हातात दिले तशी ती रिक्षा माघारी निघाली. आता तो 'अक्षरवेल' नावाच्या एका मोठ्या बंगल्याजवळ उभा होता. हेच ते मंत्रीसाहेबांच तालुक्यातलं घर होतं. बंगल्यासमोर बरेच पोलीस सुरक्षा देण्यासाठी तैनात होते. गेटवर वॉचमन उभा होता. कबीर त्या वॉचमनपाशी गेला आणि त्याला आत जाऊ देण्यासाठी विनवणी करु लागला. पण तो वॉचमन त्याला आत जाऊ देत नव्हता.

'मला मंत्रीसाहेबांना भेटायचंय, कृपया मला आत जाऊ द्या!' कबीर विनवणीच्या स्वरात बोलत होता.

'आम्ही असं कुणालाही आत नाही जाऊ देऊ शकत. आणि असेही मंत्रीसाहेब आज सकाळीच शहरात आले आहेत, पण ते अजूनही बंगल्यावर आलेले नाही. त्यामुळे तुम्ही जा ईथनं! तुम्हाला आत सोडणं अशक्य आहे.' वॉचमन कबीरला समजावत होता.

त्या दोघांचं बोलणं चालू असतानाच एक पोलिस तिथे आला.

'काय चालूय इथे? कोण आहे हा?' पोलीसाने वॉचमनला विचारलं.

'माहीत नाही साहेब! मला आत जाऊ द्या असं म्हणतोय. मी एवढं सांगूनही हा ऐकत नाहीये.' वॉचमन म्हणाला.

'अहो ते आज भेटणार होते मला. मी चंदनपूरहून आलोय.' कबीर विनवणी करत होता.
खूप वेळा बोलूनसूद्धा ते त्याला आत जाऊ देत नव्हते. थोडा वेळ तिथे तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

'आता शेवटचं सांगतोय. जा इथनं. साहेब आल्यावर या. तेव्हा बघू काय करायचं ते.' पोलीस कबीरला म्हणाला.
आणि तेवढ्यात तिथे बबनरावांचे भाऊ अभय पाटील आले. त्यांना पोलीसाने घडलेली सर्व घटना सांगितली.

'कोणतं गाव म्हणालास तू?' अभय पाटलांनी कबीरला विचारले.

'चंदनपूर'

'बरं! आत ये! साहेब येतील अर्ध्या तासात. तोपर्यंत इथे आत बस तू.' अभय पाटील म्हणाले.

वॉचमनने कबीरला चेक केलं तसा तो आत एका बाकावर जाऊन बसला.
खूप मुश्किलीने का होईना पण त्याने आत येण्याची परवानगी मिळवली होती. तो एक आलिशान बंगला होता. जवळपास चार-साडेचार हजार स्क्वे. फुटांच बांधकाम होतं. कुंपणातच निरनिराळ्या प्रकारची फुलझाडं होती. पक्षांची किलबिल ऐकू येत होती. जवळपास पाऊण तासाने चार-पाच गाड्यांच्या ताफ्यासह साहेब आले. मंत्रीसाहेबांची गाडी आत आली आणि त्यातून साहेब उतरले. ते तसेच चालत आत गेले. कबीर तसाच बसून होता. अखेर काही मिनिटांनी त्याला बोलावणं आलं. त्याचबरोबर कबीर आत निघाला. घर आतूनही प्रशस्त होतं. घरावर खूप खर्च केलेला दिसत होता. त्याला एका खोलीत बसायला सांगून तो बोलावणारा निघून गेला.

तेवढ्यात साहेब त्या खोलीत आले. आता त्या दोघांशिवाय तिथे कोणीही नव्हतं.

'नमस्कार साहेब!' कबीर आपल्या खुर्चीवरुन उठत म्हणाला.

'नमस्कार! तसं आम्हाला भेटणं इतकं सोपं नसतं, पण तू चंदनपूरहुन आलाय असं सांगण्यात आलंय मला.' साहेब खुर्चीवर बसत म्हणाले.

'हो! आण्णांनी तसा फोन केला असेलचं तुम्हाला!' कबीर म्हणाला.

'हो!' साहेब म्हणाले. आणि तेवढ्यात साठ-पासष्ठ वर्षांच्या एक आजी चहापाणी घेऊन आल्या. एवढ्या वयस्कर व्यक्तिकडून कामं करुन घेतली जात आहेत हे पाहुन कबीरला वाईट वाटलं.

'मी नाही घेत चहा!' म्हणत कबीरने पाण्याचा ग्लास हातात घेतला.

'का?' साहेबांनी विचारलं.

'चहाला विष म्हंटलं गेलंय.' कबीर म्हणाला.

'बरंबरं! पण आम्ही घेतो बुवा विष!' असं खोचक उत्तर देत साहेबांनी चहाचा कप हातात घेतला.

'मग? अखेर काय ठरवलं आण्णांनी?'

'कुणालाही राहती जमीन सोडून दुसरीकडे जाणं किती अवघड असतं याची कल्पना असेलचं तुम्हाला!' कबीर म्हणाला.

'हो! पण बदल हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे असंही मला वाटतं.' साहेब म्हणाले.

'प्रत्येक वेळेस बदलणं गरजेचं नसतं. खरंतर ज्या बदलामुळे काही चांगलं साध्य होणार नसेल, तो बदल न झालेलाच चांगला असतो.' कबीर म्हणाला.

'याने काही चांगलं साध्य होणार नाही असं वाटतंय का तुला?' साहेबांनी विचारलं. कबीर संभ्रमात पडल्यासारखा त्यांच्याकडे पाहात होता.

'याने कितीतरी बेरोजगारांना रोजगार मिळेल, व्यापाराला चालना मिळेल.' साहेब पुढे म्हणाले.

'नक्की मिळेल. पण ज्यांच्या जमिनी तुम्ही वापरणार आहात त्यांना काय मिळेल यातून?' कबीरने विचारलं.

'त्यांच्यासाठीही खूप काही आहे माझ्याकडे!' असं म्हणत साहेबांनी खिशातून एक छोटं पुस्तक काढून कबीरकडे दिलं.

'यात ह्या कारखान्याच्या योजनेविषयी सविस्तर दिलंय. शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यात काय मिळेल याचीही सविस्तर माहिती यात दिली आहे. तुम्ही हे वाचा, आण्णांनाही दाखवा. आणि मग तुमचा अंतिम निर्णय कळवा. इतकं तडकाफडकी निर्णय घेणं चांगलं नसतं.' साहेब म्हणाले.

कबीर विचार करत होता. त्याने त्या पत्रकावरुन नजर फिरवली.

'मी हे आण्णांना एकदा दाखवून पाहीन. पण त्यांचा निर्णय बदलेल असं मला वाटत नाही. त्यामुळे शक्यतो त्यांचा नकारच तुम्ही गृहीत धरा.' कबीर म्हणाला.

'ते बघू आपण. तुम्ही बोलून पहा आधी आण्णांशी. बाकी गावात कसे आहात सर्वे?' साहेबांनी विचारलं.

'ठिक आहेत! मागे गावातल्या दोन शेतकऱ्यांवर अज्ञातांनी हल्ला केला होता. ते कळालं असेलचं तुम्हाला.' कबीर म्हणाला.

'हो! कळालं होतं मला! आमच्या माणसांनी जरा जास्तच मारलं होतं त्यांना. एवढं मारायला खरंच नको होतं.' साहेब म्हणाले.

कबीर आ वासून त्यांच्याकडे पाहात होता. त्याचा त्याच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. पण अखेर त्याला पंढरीनाथांचे शब्द आठवले, आणि त्याला त्यांच्या बोलण्याची खात्री पटली.

'तुमची महिमा तुमच्याच तोंडून सांगितल्याबद्दल खरंच धन्यवाद! मला वाटलं होतं कि पंढरीनाथांचा काहीतरी गैरसमज झाला असेल पण...'

'पण काय?'

'काही नाही. जाऊ द्या आता!' कबीर म्हणाला तसे साहेब मोठमोठ्याने हसू लागले.

'काय झालं?' कबीरने विचारलं.

'आण्णांना मी खूप पुर्वीपासून ओळखतो. ते मला सहजासहजी जमिनी मिळू देणार नाहीत हे

मला ठाऊक होतं.' साहेब म्हणाले.

'म्हणून तुम्ही हा मार्ग अवलंबला?' कबीरने विचारलं.

'माझ्याकडे पर्याय नव्हता कबीर. मला ह्या जमिनी हव्या आहेत. कुठल्याही किमतीत.' साहेब म्हणाले.

'तुमचं वागणं फार वाईट आहे असं नाही वाटत तुम्हाला?' कबीरने विचारलं.

'असू द्या! चांगलं वागून आण्णा ऐकणार नाहीत, हे माहीत होतं मला.' साहेब म्हणाले.

'आम्ही पोलिसात जाऊ!' कबीर म्हणाला तसे साहेब कुत्सित नजरेने त्याच्याकडे पाहु लागले.

'मी या राज्याचा गृहमंत्री आहे हे विसरताय तुम्ही कबीरराव.'

'असं बोलताना थोडीपण लाज नाही वाटत तुम्हाला? लोकांच्या कल्याणासाठी तुमची निवड झालीये आणि...'

'मुळात आमची लाज काढणारे तुम्ही कोण?' कबीरचं बोलणं मध्येच थांबवत साहेब म्हणाले.

'स्वत:च्या आयुष्याला काही अर्थ आहे का ते पाहा आधी. ना घरदार, ना आईबाप, ना मुलबाळ जगता कशासाठी तुम्ही? आधी स्वत:च्या आयुष्याचा अर्थ शोधा आणि मग आमची लाज काढा!' साहेब पुढे म्हणाले.

त्यांचे शब्द कबीरच्या जिव्हारी लागले होते. त्याच्या मनात स्वत:बद्दल शंका निर्माण झाली होती.

'हे सर्व असणं म्हणजेच आयुष्य असतं असं वाटतंय का तुम्हाला? जीवनात काही तत्वे असावी लागतात.' कबीर म्हणाला.

'तत्वांनी पोट नाही भरत!' साहेब म्हणाले.

'मग चोऱ्या  करणार?' कबीरने विचारलं.

'आपल्याच घरात कोणी चोरी करतं का? आम्ही सत्ताधारी आहोत हे विसरताय तुम्ही! इथे आमचं राज्य आहे.' साहेब म्हणाले.

'खरच! तुमच्याबद्दल थोडाफार आदर वाटत होता, आता तोही गेला.' कबीर म्हणाला.

'आम्हाला तुमच्या आदराची गरज नाहीये. आमचा आदर करणारे खूप जण आहेत इथे.' साहेब म्हणाले.

'बोलून काहीतरी चांगलं निष्पन्न होईल असं वाटलं होतं. म्हणून इथे आलो होतो पण...' कबीर बोलता बोलता थांबला.

'जाऊ द्या ते! निघतो मी आता!' कबीर म्हणाला.

'बरं! तुम्ही हा सर्व प्रकार आण्णांना सांगाल अशी आशा करतो मी.' साहेब म्हणाले पण कबीरचं तिकडे लक्ष नव्हतं. तो उठला आणि बाहेरच्या दिशेने चालू लागला. तो सुन्न होऊन गेला होता. आण्णांना हे सर्व सांगितल्यावर त्यांची काय प्रतिक्रिया असेल ही पण एक मोठी चिंता होती. दुपारचे दोन वाजून गेले होते. त्याला गावात जायची मुळीच ईच्छा होत नव्हती. त्यामुळे तो शहरात टंगळमंगळ करत सायंकाळी पाच वाजता संस्कृतीमंदिरात आला.

तो जेव्हा संस्कृतीमंदिरात पोहोचला तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्का बसला कारण आण्णा तिथे आले होते. अविनाशशी ते काहीतरी बोलत होते.

'आण्णा तुम्ही इथे?' कबीरने विचारले.

'तू आलास? तुझ्याचसाठी थांबलोय! भेटला तो?' आण्णांनी विचारलं.

'हो! भेटले ना!'

'मग? तू आपल्या निर्णयाविषयी सांगितलं ना? काय म्हणाला तो? बोल ना!' आण्णा म्हणाले.

'त्यांना ती जमीन हवीय आण्णा. कुठल्याही किमतीत. पंढरीनाथ खरं सांगत होते, ती माणसं त्यांचीच होती.' कबीर म्हणाला.

'काय? कुठल्याही किमतीत जमीन पाहीजे म्हणजे काय बापाची ठेव आहे का यांची?' आण्णा जागेवरुन उठत म्हणाले.

'आण्णा तुम्ही शांत व्हा.' अविनाश आण्णांना समजावत म्हणाला.

'अरे पण...'

'आण्णा! आपण काढू काही तरी उपाय. तुम्ही बसा आधी.' कबीर म्हणाला.

त्याने अविनाशला बाजूला येण्याचा इशारा केला तसा अविनाश जागेवरुन उठायला लागला.

तेवढ्यात...

'आपण पोलिसात जाऊ. तक्रार देऊ त्या भडव्याविरुद्ध!' आण्णा म्हणाले.

'आपण नक्की जाऊ आण्णा. तुम्ही शांत व्हा आधी. आता बराच उशीर झालाय. तुम्ही अंधार होण्याच्या आत गावात गेलेलं बरं असेल, असं मला वाटतं.' कबीर म्हणाला.

आण्णा आता थोडे सावरले होते.

'हो! तुझंही बरोबर आहे. घाईघाईत बऱ्याचदा चूकिचे निर्णय घेतले जातात. आता जातो मी.' आण्णा म्हणाले.

'तुम्ही जास्त विचार नका करु आण्णा. आम्ही काढू काहीतरी उपाय.' अविनाश म्हणाला.

आण्णांनी विश्वासाने त्याच्याकडे पाहीलं.

'तुम्ही एकटे जाल? कि पाठवू कुणाला?' कबीरने विचारलं.

'नाही! मी जाईन एकटा! या वयात नशिबात अजून काय काय लिहुन ठेवलंय देवच जाणो!' असं म्हणत आण्णा जायला निघाले. त्यांना असं थकलेलं पाहून कबीरला वाईट वाटत होतं.

'झालं काय आहे नक्की?' आण्णा गेल्यावर अविनाशने विचारलं.

'काय सांगू अविनाश, तो माणुस मागे हटेल असं वाटत नाहीये. मी स्वत:च सुन्न होऊन गेलोय. काय करावं समजत नाहीये.' कबीर म्हणाला.

'ते म्हणताय तसं आपण पोलिसात जाऊ.' अविनाश म्हणाला.

'या सर्व गोष्टींचा विचार त्यांनी आधीच करुन ठेवलाय. त्यामुळे याचा त्यांच्यावर काही फरक पडेल असं मला वाटत नाही.' कबीर म्हणाला.

'त्यांनाही पैसे चारतील. अजून काय!' अविनाश म्हणाला.

'बहुतेक!' कबीर म्हणाला.

'मग आता काय करायचं?'

'बघू! निघेल काहीतरी मार्ग!' असं म्हणत कबीर संस्कृतीमंदिराच्या उद्यानात जायला निघाला. अविनाशही त्याच्यामागे होता. कबीर मावळत्या सूर्याकडे एकटक पाहात होता. मुखमंडल शांत

असलं तरी मनात विचारांच्या लाटा उसळत होत्या. अविनाशही त्याच्या बाजुला येऊन उभा राहीला.

'ते अजुन एक गोष्ट म्हणाले होते अविनाश! ती आपल्याविषयी होती.' कबीर म्हणाला.

'कोणती गोष्ट?'

'तुमच्या आयुष्याला काही अर्थ आहे का असा प्रश्न त्यांनी मला केला होता. ज्याचं माझ्याकडे उत्तर नव्हतं. तुम्हाला आईबाप, मुलबाळ, घरदार नाही मग तुम्ही जगता कशासाठी असंही ते म्हणाले. खरच आपलं जगणं इतकं निरर्थक आहे का रे?' कबीरने विचारलं.

'असं नाहीये कबीर. प्रत्येक व्यक्ती स्वत:साठी जितका जगत असतो तितकाच तो कुटूंबासाठीही जगत असतो.

त्या कुटूंबामध्येच त्याचे आईबाप, मुलंबाळं मोडत असतात. तसं आपल्याला कोणीच नाही. दिवसभर माणसाने कितीही कष्ट केले तरी संध्याकाळी त्याला स्वत:च्या घराचं छत्र हवंहवंसं वाटत. आपलं स्वत:चं असं कुणीतरी असावं असं प्रत्येकाला वाटत असतं. असं असलं तरी आपलं आयुष्य निरर्थक नाहीये कबीर. आपण ज्यांच्या छत्राखाली उभे आहोत त्या विवेकानंदांनीही हेच केलंय. त्यांनीही संसार नाही केला. मागे तुच म्हणाला होतास ना कि त्यागातच खरा आनंद, खरं सुख असतं म्हणून! सामान्य माणूस ज्या चार लोकांसाठी त्याग करतो, तो त्याग विवेकानंदांनी अख्ख्या देशासाठी केला. सामान्य माणूस ज्या चार लोकांसाठी जगाशी लढत असतो, तिथेच स्वामीजी देशातल्या जनतेसाठी जगाशी लढले. आपल्या देशाचं, लोकांचं, संस्कृतीचं महत्व त्यांनी जगाला पटवून दिलं. आणि आता बघ तो माणूस कुठे आहे, असामान्य कार्य करुन असामान्य होऊन गेलाय.' अविनाश म्हणाला.

कबीर अविनाशचा शब्दन शब्द कानात साठवत होता. दोघंही आता मंत्रमुग्ध होऊन मावळत्या सूर्याकडे बघत होते. पुढची पंधरा मिनिटं शांततेत गेली.

'स्मृतिका तुझ्या सोबत असायला हवी होती असं त्यानंतर तुला कधीच नाही वाटलं कबीर?' अविनाशने विचारलं.

'असायला तर हवी होती पण...'

'पण काय?'

'ती हे जग सोडून गेलीये अविनाश. मी तुला सांगितलं होतं ते अर्धसत्य होतं. तिने दुर होण्याचा निर्णय घेतला होता कारण ती भविष्य पाहु शकत होती. लग्न न करण्याचा निर्णय तिचा होता. कारण तिला सर्वांनाच धरुन राहायचं होतं. तिच्या आईबाबांना आणि मलाही. तिच्या आजाराबद्दल तिला पुर्ण कल्पना होती. पुढे काय होणार आहे हे तिला ठाऊक होतं. पण तिला कोणालाही दुखवायचं नव्हतं. सर्वांना धरुन राहायच्या प्रयत्नात ती स्वत:च निसटून जाणार आहे हे माहीत असुनसुद्धा ती हे सर्व करत होती. आणि अखेर तेच झालं जे नशिबात होतं.' कबीर म्हणाला.

अविनाश हे ऐकून सुन्न होऊन गेला होता. त्याने हळूच कबीरच्या खांद्यावर हात ठेवला.

'सर्व विसरुन पुढे जायचंय आपल्याला!' अविनाश म्हणाला.

'मी सावरलोय आता. पण या लोकांना असं वागताना थोडीपण लाज कशी नाही वाटत?' कबीरने विचारलं.

'जगात वाईट आहे म्हणून तर चांगल्याला किंमत आहे कबीर. पण अशा परिस्थितीत आण्णांसोबत राहायचं कि नाही हा सर्वस्वी तुझा निर्णय असेल.' अविनाश म्हणाला.

'तुला काय वाटतं?' कबीरने विचारलं.

'सर्वांसोबत मरण्यापेक्षा जिवंत राहणं उत्तम, असं मला वाटतं. माझं म्हणणं तुला फारसं पटणार नाही. पण जी लढाई आपण सुरू होण्यापूर्वीच हरलेलो असतो, त्या लढाईला काहीच अर्थ नसतो. भावनेच्या आहारी जाऊन विचार करण्यातही काहीच अर्थ नसतो.' अविनाश म्हणाला.

कबीर विचार करत होता. आता तो एकटाच तिथे होता. सूर्य आता पूर्णपणे मावळला होता. सर्वत्र काळोख पसरलेला होता. सर्व बदलत असलं तरी त्याच्या मनाची अवस्था मात्र बदलत नव्हती. चांगलं काय, वाईट काय याची जाणीव होत असली तरी त्याचं एक मन अविनाशच्या म्हणण्याशी सहमत होतं.

तो आता थकला होता. रात्री जेवतानाही तो फारसं कुणाशी बोलला नाही. थकल्यामुळे त्याला झोपही लवकर लागली. दुसऱ्या दिवशी तो जरा उशीरानेच उठला. आज संस्कृतीमंदिरात धर्मचर्चा होणार होती. सकाळी अकरा वाजता धर्मचर्चेला सुरुवात होणार होती. सर्वजण येऊन

बसले होते. त्यांच्यात कबीरही होता. पण इतर वेळेस भरभरुन बोलणारा कबीर मात्र आज शांत होता. त्याच्या मनात असंख्य प्रश्न उठले होते, आपण इथे येऊन धर्मचर्चा करतो. माणसाचं वागणं कसं असावं, त्याने काय करायला हवं याची चर्चा आपण येथे करतो. पण खरचं आपण तसे वागतो का? कि आपण नुसत्या गप्पा मारतो? जे करायला हवं त्याकडे आपण सोईस्कररीत्या डोळेझाक करतोय असं त्याला वाटून गेलं. आपल्या मनाचा आपल्या आयुष्यावर किती मोठा परिणाम होत असतो हे त्यावेळी त्याला प्रकर्षाने जाणवत होतं. त्याचं मन अस्वस्थ होतं आणि त्याचमुळे त्याला सर्व निरस वाटत होतं. त्यावेळी त्याने काय करायला हवं हे माहीत असुनसुद्धा त्याच्या मनाची तयारी होत नव्हती. आता धर्मचर्चा संपली होती. तो दिवस असाच गेला. दिवसभरात आण्णांचाही काही चक्कर नव्हता.

रात्रीचे बारा वाजले होते. कबीरला स्वप्न पडत होतं. त्या स्वप्नात त्याच्या आजुबाजूला बरीच मंडळी होती. त्या मंडळींमध्ये सुभाषचंद्र बोस, सावरकर, महात्मा गांधी, भगतसिंग हे सर्व होते. हे सर्वजण त्याला घेरुन उभे होते. त्या सर्वांच्यामध्ये तो स्वत: उभा होता. सर्वजण त्याच्याकडे जणू रागाने पाहात होते.

'तू जे केलंय त्याचा फार अभिमान वाटत असेल तुला? होय ना?' नेताजींनी विचारलं.

'पण मी काय केलंय?'

'काहीही न करुन तू खूप काही केलंय. अरे ज्यांच्यासाठी आम्ही परकियांविरुद्ध लढलो ते हेच का? भित्रे, अशक्त आणि स्वत:ला सांभाळणारे!' नेताजी रागाने लालबुंद झाले होते.

'मी काय करायला हवं, ते तरी मला सांगा!' कबीर म्हणाला.

'अरे पण सांगण्याची वेळ का येतेय आमच्यावर? स्वातंत्र्यासाठी लढा द्या असं आम्हाला कोणी सांगायला नव्हतं आलं! मुळात त्यासाठी मनात अन्यायाविषयी तिव्र चिड असावी लागते.' सावरकर म्हणाले.

'माझं मन द्विधा मनस्थितीत आहे. मला कृपया सांगा मी काय करायला हवं ते.' कबीर म्हणाला
.

त्याचबरोबर आतापर्यंत शांत असलेले महात्मा गांधी बोलण्यासाठी पुढे आले.

'लढा दे! काय होईल याची पर्वा नको करु. दोन वाईट गोष्टी मिळूनसुद्धा एक चांगली गोष्ट नाही बनत, हे लक्षात ठेव. तू एकटा असलास तरी तू सत्याच्या बाजुने असशील. स्वत:वर विश्वास ठेव आणि अहिंसक लढा दे. तू नक्की विजयी होशील. गांधीजी म्हणाले.

'पण याचे परिणाम...' कबीर म्हणाला पण त्याचं वाक्य मधेच थांबवत भगतसिंग बोलण्यासाठी पुढे आले.

'अरे आम्ही परिणामांची पर्वा करत राहीलो असतो तर हा देश आजही पारतंत्र्यात राहीला असता, हे विसरतोय का तू? आम्ही भविष्य पाहू शकत होतो, आम्ही देशाला स्वतंत्र झालेलं पाहू शकत होतो म्हणून हे करु शकलो. तूही स्वत:वर विश्वास ठेव आणि स्वत:ला विजयी झालेलं पहा. तुला सत्ताधाऱ्यांना नमवायचं नाहीये तर सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्यांना नमवायचं आहे हे लक्षात ठेव.' भगतसिंग म्हणाले.

आणि अचानक कबीरला जाग आली. तो घामाने पुर्णपणे भिजला होता.

'हे काय होतं?' तो स्वत:शीच पुटपुटला. त्याने मनगटावरच्या घड्याळात पाहीलं तर रात्रीचे दोन वाजले होते. तो परत झोपला. पण आता खूप प्रयत्न करुनसुद्धा त्याला झोप लागत नव्हती. अखेर रात्री उशीरा केव्हातरी त्याला झोप लागली. सकाळी तो उठला तेव्हा त्याच्यात एक अनामिक तरतरी आली होती. त्याचं स्वप्न अर्धवट राहीलं होतं तरीही ते त्याला खूप काही सांगून गेलं होतं. काहीतरी चांगलं होईल याची खात्री त्याला आता वाटू लागली होती.

आज त्याने आण्णांकडे जायचं ठरवलं होतं. तो अविनाशच्या खोलीकडे निघाला होता. त्याला पडलेलं स्वप्न तो अविनाशला सांगणार होता.

तो त्याच्या खोलीत आला तेव्हा अविनाश गीतेचं पठन करत होता. त्याचं पठन होईपर्यंत तो तिथेच बसला. दहा मिनिटांनी त्याची गीता वाचून पूर्ण झाली. कबीरने आपल्याला पडलेल्या स्वप्नाविषयी त्याला सांगितलं. अविनाशही त्याचं बोलणं शांतपणे ऐकून घेत होता.

'स्वप्नांना अर्थ असतो असं तुला वाटतं कबीर?' अविनाशने विचारले.

'माहीत नाही. पण त्यांनी जे सांगितलंय त्याला नक्कीच अर्थ आहे.' कबीर म्हणाला.

'तू काय करायचं ठरवलंय मग?' अविनाशने विचारलं.

'मी आण्णांसोबत असेन. आणि तू?'

'आण्णांचं माहीत नाही पण माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.' अविनाश म्हणाला तसा कबीरच्या चेहऱ्यावर हलकिशी स्मितरेषा उमटली.

मी आण्णांना भेटायला जाणार आहे असं सांगितल्यावर अविनाशही सोबत येण्यासाठी तयार झाला.

सकाळी दहा वाजता ते गावात येऊन पोहोचले. आण्णांच्या वाड्यापाशी ते आले तेव्हा तिथे कोणीच दिसत नव्हतं. म्हणून ते पायऱ्या चढून वर गेले. तेव्हा समोरुन आण्णांचा नातू येताना दिसला. विचारल्यावर कळालं कि आण्णा आजारी होते. आदल्या दिवशी रात्रीपासून त्यांना ताप भरला होता. सकाळी सकाळीच डॉक्टर येऊन गेले होते. कबीर आणि अविनाश आण्णांना भेटण्यासाठी त्यांच्या खोलीत गेले तेव्हा आण्णा निपचीत पडून होते. त्यांनी डोळे किलकिले करुन दोघांकडे पाहीलं. त्यांनी हातांनीच दोघांना बसण्यासाठी सांगितलं. आण्णांच्या पत्नी शारदादेवी पण बाजूलाच खुर्चीवर माळेचा जप करत होत्या.

'आण्णा कसं वाटतंय?' त्यांच्या हाताला स्पर्श करत कबीरने विचारलं.

आण्णा काहीच बोलले नाही. परंतू त्यांच्या नजरेतून कबीरला कळत होतं कि त्यांना वेदना होत होत्या.

'आता काय करायचं?' आण्णांनी विचारलं.

'कशाविषयी?' कबीरने विचारलं.

'पोलिस काहीही करायला तयार नाहीयेत कबीर! ते केस फाईल करायला नकार देताय. त्यांना पुरावे हवे आहेत.' आण्णा म्हणाले.

'पण असं कसं करु शकतात ते?'

'त्यांनी असं केलंय! अभय पाटील काल संध्याकाळी पुन्हा गावात आला होता. आपल्या हालचाली त्याला समजल्या असतील कदाचित. जमिनीसाठी मी काहीही करेल असं तो म्हणत होता. सर्वांना जीवानीशी मारण्याची धमकीही त्याने दिली. त्याने पोलिसांना पैसे देऊन विकत घेतलंय असंही काही जण म्हणत होते. अशात आपण काही करु शकतो असं वाटत नाही मला.' आण्णा म्हणाले.

'आपण कोर्टात जाऊ शकतो आण्णा!' कबीर म्हणाला.

"नक्कीच आपण जाऊ शकतो. पण त्याने सर्व गोष्टी फार किचकट होऊन बसतील. त्या केसचा निकाल कधी लागेल सांगता येणार नाही. आणि आपण त्याच्या विरोधात जातोय हे पाहून तो सूड उगवल्याशिवाय राहणार नाही. आपल्याकडे त्याच्याविरोधात काहीच पुरावे नाहीये. तू समजू शकतोस मला काय म्हणायचंय ते!' आण्णा म्हणाले.

'हो! पण त्याने गावकऱ्यांसमोर जो प्रस्ताव ठेवलाय, तोच पुरावा नाही होऊ शकत का?'

कबीरने विचारलं.

'नाही! त्या प्रस्तावावरुन तो ही जमीन आपल्याकडुन बळजबरीने घेतोय असं सिद्ध होऊ शकत नाही.' आण्णा म्हणाले.

'याचा अर्थ कोर्टात जाण्याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही.' कबीर म्हणाला.

'कदाचित! पण त्याआधी मी मुख्यमंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न करणार आहे. बबनराव पाटील हा बाहुबली नेता आहे. जोपर्यंत त्याच्याकडे सत्ता आहे तोपर्यंत आपण त्याच्या केसालाही धक्का नाही लावू शकत, हे त्याला ठाऊक आहे. त्यामुळे कोर्टात जाण्याचा पर्याय ठिक असेल असं मला वाटत नाही.' आण्णा म्हणाले.

'याचा अर्थ जोपर्यंत त्याच्याकडे सत्ता आहे तोपर्यंतच तो...'

'हो अविनाश! सत्ता त्याच्यासाठी सर्व काही आहे. तो नांगी असलेल्या एखाद्या विषारी विंचवासारखा आहे.

जोपर्यंत विंचवाकडे त्याची नांगी असते, तोपर्यंत तो त्याची दहशत पसरवतो. त्याची नांगी एकदाची ठेचली कि त्याचं अस्तित्व संपत असतं. याचंही तसंच आहे. जोपर्यंत हातात सत्ता आहे तोपर्यंत तो दहशत पसरवेल. सत्ता गेली कि त्याची अवस्था त्या विंचवासारखी होऊन बसेल.'

अविनाशचं वाक्य मध्येच थांबवत आण्णा म्हणाले.

'पण विंचवाची नांगी ठेचण्याच्या प्रयत्नात त्याचा डंख आपल्याला बसण्याची शक्यता असते. त्यामुळे आपण ही जोखिम नाही घेऊ शकत आण्णा. आपल्याला यावर खात्रीशीर असा उपाय शोधावा लागेल.' अविनाश म्हणाला.

'त्याचसाठी मी मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे. माझी अवस्था अशी असली तरी मी जाईन. मी

स्वत: गेलेलंच बरं असेन. यातूनतरी काही चांगलं निष्पन्न व्हायला हवंय. तसं नाही झालं तर, परिस्थिती फार बिकट होऊन बसेल. गावातले सर्वजण माझ्याकडे आशेने बघताय. मीच यावर काहीतरी तोडगा काढेन याची त्यांना खात्री आहे. पण जर जमीन द्यायची वेळ त्या सर्वांवर आली तर...'

'तर काय आण्णा?' कबीरने विचारलं.

'पुढचं काहीच सांगता येत नाही कबीर, त्याच्या प्रस्तावानूसार तो जमिनीचा योग्य मोबदला देणार आहे. पण तो केव्हा देईल, किती देईल याचा कुठलाही उल्लेख त्यावर नाहीये. देईलच याचीही खात्री नाही.' आण्णा म्हणाले.

'काळजी नका करु आण्णा! निघेल मार्ग.' कबीर म्हणाला.

'मार्ग निघायलाच हवा कबीर. या शेतकऱ्यांवर त्यांच्या जमिनी देण्याची वेळ न येवो हीच ईश्वरचरणी माझी प्रार्थना आहे.' आण्णा म्हणाले.

'सर्व ठिक होईल आण्णा. माझ्यावर विश्वास ठेवा.' आपला हात आण्णांच्या हातावर ठेवत कबीर म्हणाला.

'तुला खरंच असं वाटतं?' आण्णांनी विचारलं.

'सर्व दारं बंद झाली तर मी असेन, हे लक्षात ठेवा!' कबीर म्हणाला.

आण्णा आशेने छताकडे पाहात होते.

'बरं! आता येतो आम्ही. तुम्हालाच भेटायला आलो होतो. काही चांगली बातमी मिळाली तर कळवा. काळजी घ्या! येतो!' असं म्हणत कबीर उठला. त्याचबरोबर अविनाशही उठला आणि ते दोघे निघाले.

थोड्याच वेळात ते संस्कृतीमंदिरात येऊन पोहोचले.

'काय वाटतं तुला कबीर? काय होईल पुढे?' अविनाशने विचारलं.

कबीर काहीच बोलला नाही.

'बोल ना!' अविनाश परत म्हणाला.

'तुला काहीतरी दाखवायचंय मला!' कबीर म्हणाला.

'काय? दाखव ना!'

'चल मग!' असं म्हणत कबीर त्याला व्यवस्थापकांच्या खोलीत घेऊन गेला. तिथून व्यवस्थापकांना विचारुन त्याने त्यांचं लॅपटॉप घेतलं आणि अविनाशला घेऊन तो परत त्याच्या खोलीत आला.

'काय झालंय कबीर? लॅपटॉप का आणलंय?' अविनाशने अस्वस्थ होत विचारलं.

'एक मिनिट थांब!' असं म्हणत त्याने त्याच्या खिशातून एक पेनड्राईव काढला आणि तो लॅपटॉपला जोडला.

'काय झालंय सांग ना!' अविनाशने परत विचारलं.

'थांब ना! ये बस इकडे!' म्हणत कबीरने एक व्हिडीयो चालू केला.

पुढच्या पंधरा मिनिटात अविनाशने जे पाहीलं ते अविश्वसनीय होतं. तो कमालीचा आश्चर्यचकीत झाला होता.

'हे काय होतं?' अविनाशने विचारलं.

'कसं वाटलं?'

'पण हे सर्व तू कसं केलं ते सांग ना!' अविनाशने परत विचारलं.

'माझा एक मित्र राहतो तालुक्याला. तो पत्रकार आहे. मंत्रीसाहेबांच्या बंगल्यावर जाण्याआधी मी त्याच्याकडे गेलो होतो. त्यानेच मला ही कल्पना सांगितली. त्यानेच तो बटन कॅमेरापण मला दिला. म्हणून मी हे सर्व करु शकलो.' कबीर म्हणाला.

'हा खूप मोठा पुरावा आहे कबीर!' अविनाश म्हणाला.

'हो! पण आता मी फक्त आण्णांची वाट पाहीन. त्यांच्याकडून हा प्रश्न सुटला तर खूप चांगलं होईल. पण जर नाही सुटला तर...'

'तर काय?'

'तर माझ्या डोक्यात एक कल्पना आली आहे. ती मी सत्यात उतरवेन.' कबीर म्हणाला.

'कसली कल्पना?'

'आंदोलनाची! जर सर्व रस्ते बंद झाले तर मी आंदोलन करणार. मी उपोषण करणार. शेतकऱ्यांच्या मागण्या त्याचबरोबर त्या भ्रष्ट मंत्र्याला पायउतार करण्याची मागणी घेउन.' कबीर म्हणाला.

'अरे पण...'

'मला माहीतीये अविनाश, आजपर्यंत अशा प्रकारच्या मागण्या घेऊन कुणीही उपोषण करण्याचा मार्ग निवडला नाहीये. पण आपल्याकडे दुसरा पर्याय नाहीये. त्या विंचवाची नांगी ठेचायची असेल तर हे करावच लागेल. आपल्यासाठी तो आहे, त्याच्यासाठी आपण नाही हे आपल्याला दाखवून द्यावच लागेल. काय म्हणतो?' कबीर म्हणाला.

'तुला खरंच वाटतं असं काही करण्याची गरज आहे?' अविनाशने विचारलं.

'हो! ह्या निरर्थक आयुष्याला अर्थ प्राप्त करुन देण्यासाठी हे करावंच लागेल.' कबीर म्हणाला.

'तुझं म्हणणं मला पटतंय, पण...'

'असं किती दिवस जगायचं आपण अविनाश? ना कुठला रस्ता ना कुठलं ध्येय! कुठे जातोय तेही नाही माहीत. फक्त हे शरीराचं ओझं घेऊन फिरतोय आपण. मागे तुच म्हणाला होतास ना, कि असामान्य कार्य केलं म्हणून नरेंद्राचे स्वामी विवेकानंद झाले. तुकारामांचे संत तुकाराम झाले. त्यांनी अख्ख्या देशासाठी, समाजासाठी कार्य केलं. आपण या गावासाठी तर करुच शकतो ना?' कबीर जीवाच्या आकांताने बोलत होता. आता अविनाशलाही त्याचं म्हणणं पटू लागलं होतं. त्यालाही शरीरात अनामिक उर्जा जाणवू लागली होती.

'तसं असेल तर मग शेवटपर्यंत हार नाही मानायची.' अविनाश म्हणाला.

त्याच्या बोलण्यामुळे कबीरला आनंद होत होता.

आता रात्रीचे दहा वाजले होते. जेवणं झाली असल्यामुळे सर्वजण आपापल्या खोलीत जाऊन झोपले होते. अविनाशही त्याच्या खोलीत पडला होता. त्याच्या मनात असंख्य विचार येत होते. महान लोकांच्या सहवासात राहील्याने आपणही महान होत असतो, असं म्हंटलं जातं. पण अविनाश ते आज अनुभवत होता. महान लोकांचा आदर्श सर्वजण ठेवत असतात. पण त्यांचे

अनुकरण करणारे किती असतात? फारच थोडे. कबीर त्यापैकीच एक होता. जेव्हा ह्या देशातले सर्वजण महान लोकांच अनुकरण करतील तेव्हा हा देश कुठे जाऊ शकतो याचा अंदाज त्याला येत होता.

पुढचे दोन दिवस असेच गेले.

तिसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता आण्णा संस्कृतीमंदिरात आले. त्यांच्यासोबत अजून दोनजण होते. ते कबीर आणि अविनाशशी बोलत होते. अखेर जे व्हायला नको होतं तेच झालं होतं. मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आण्णांना अपयश आलं होतं. ते सर्वजण चिंतेत दिसत होते.

'सर्व अवघड होऊन बसलंय कबीर. मला वाटलं होतं तितकं सोपं नाहीये त्यांना भेटणं.' आण्णा म्हणाले.

कबीर काहीच बोलला नाही. तो विचार करत होता.

'त्यांना भेटूनही हा प्रश्न सुटेलच याची काय खात्री आण्णा?' अविनाशने आण्णांना विचारलं.

'खात्री तर देता येणार नाही. पण प्रयत्न करणं आपलं काम आहे अविनाश. सध्या तरी माझ्या हातात तेवढंच आहे.' आण्णा म्हणाले.

'आपण त्यांना भेटू शकतो आण्णा. ते आपलं म्हणणंही ऐकतील. फक्त मी सांगतोय तसं करावं लागेल.' कबीर म्हणाला.

'मी त्यासाठी वाटेल ते करायला तयार आहे.' आण्णा म्हणाले.

आण्णांनी असं म्हणताच कबीरने तो व्हिडीयो त्यांना दाखवला. प्रत्येक क्षणानंतर आण्णांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलत होते.

'हे काय होतं कबीर?' आण्णांनी अविश्वासाने विचारलं.

'पुरावा! कसा वाटला?' कबीरने विचारलं.

'अविश्वसनीय! पण.. जाऊ दे! तू हे कसं केलं हे मी विचारणार नाही. मी फक्त तुझे आभार मानू शकतो. आपण याचं काय करायला हवं ते सांग कबीर! तू सांगशील तसं होईल!' आण्णा म्हणाले.

कबीरने सर्वकाही आण्णांना सांगितलं. आंदोलन का करायला हवं, त्याचे फायदे त्याने आण्णांना

समजावून सांगितले. पुढचा पाऊण तास आण्णा कबीरचं म्हणणं शांततेने ऐकून घेत होते.

'आण्णा तुम्ही जा आता. सर्वकाही आमच्यावर सोडा. माझे काही मित्र आहेत श्रीवर्धनचे. त्यांनाही मी फोन करुन सांगून ठेवणार आहे. तुम्ही फक्त गावातल्या शेतकऱ्यांना याविषयी कल्पना द्या. शेतीची कामं काही दिवस बाजूला राहीली तरी चालतील पण त्यांना या आंदोलनात सहभागी व्हायला लावा. हे सर्व फसायला नकोय.' कबीर म्हणाला.

'प्रश्नच नाही. सर्वजण बिनशर्त तुमच्या पाठीशी असतील कबीरभाऊ.' आण्णांसोबत आलेला एकजण म्हणाला.

'माझ्या आयुष्यात आजपर्यंत खुप अडचणी आल्या, पण तरी मी कधी खचलो नव्हतो. पण आज खरच...'

'आण्णा! समजू शकतो मी. पण आता मागे वळून नाही पाहायचं.' आण्णांचं वाक्य मध्येच थांबवत कबीर म्हणाला.

'येतो आम्ही आता. मी आभारी आहे तुमचा.' आण्णा कबीरच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले.

आज आण्णांना पाठमोरं जाताना पाहून कबीरला बरं वाटत होतं. मागे काही दिवसांपूर्वी ते संस्कृतीमंदिरात आले होते तेव्हा खचलेले होते. पण आज आण्णांना आशा वाटायला लागली होती.

आण्णा निघून गेले. कबीर व्यवस्थापकांच्या कचेरीत गेला. त्याला त्याच्या काही मित्रांना फोन करायचे होते. त्याने त्याच्या जुन्या डायरीतून त्या सर्व मित्रांचे नंबर काढले, आणि तो एकेकाला फोन करु लागला. त्यापैकी काहींचे फोन लागले नाहीत, पण ज्यांचे लागले त्यांनी दुसऱ्या दिवशी संस्कृतीमंदिरात येण्याची
हमी कबीरला दिली. त्याचे बरेच मित्र मोठमोठ्या हुद्यांवर नोकरीला होते. एक-दोन जण पत्रकारपण होते.

तो आता त्याच्या खोलीत आला होता. जे करायचं होतं त्याविषयी मनात कुठलीही शंका नव्हती. तेवढ्यात तिथे अविनाश आला.

'मी उद्या श्रीवर्धनला जाणार आहे.' अविनाश म्हणाला.

'तालुक्याला?' कबीरने विचारलं.

'हो! हे सर्व करण्यासाठी नगरपालिकेची कायदेशीर परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी मला उद्या जावं लागेल.' अविनाश म्हणाला.

'बरंबरं! पण अविनाश... हे सर्व होईल ना ठिक?' कबीरने विचारलं.

'सर्व ठिक होईल. जास्त विचार नको करु. गांधीजी काय म्हणाले ते आठव आणि कामाला लाग.' अविनाश म्हणाला.

आता रात्र झाली होती. उद्याची सकाळ या सर्वांच्या आयुष्याला दिशा देणारी ठरणार होती.

सकाळी ठरल्याप्रमाणे अविनाश लवकर उठला आणि नऊ वाजताच तो श्रीवर्धनला जाण्यासाठी रवाना झाला. सकाळी साडेदहाच्या सुमारास कबीरचे काही मित्र तिथे आले. ते तीन जण होते. त्यापैकी निरंजन हा एक बीएचएमएस डॉक्टर होता. श्रीवर्धनमधेच त्याचं एक छोटं क्लिनीक होतं. देवाशीष हा त्याचा लहानपणापासूनचा मित्र. तोही शिक्षक होता. आणि तिसरा अतुल. हा तोच होता ज्याने कबीरला बटन कैमेरा दिला होता. तो एक चांगला पत्रकार असल्यामुळे त्याच्याकडून कबीरला जास्त अपेक्षा होत्या. आज इतक्या दिवसांनी आपल्या मित्राला पाहून सर्वांनाच आनंद झाला होता. त्या सर्वांना कबीरने आपल्या योजनेविषयी सांगितलं. त्याचं म्हणणं सर्वांना पटत होतं. सर्वांनी त्याला बिनशर्त मदत करण्याची हमी दिली.

दुपारी एकच्या सुमारास तिघं मित्रांसोबत कबीर चंदनपूरात आला. त्या सर्वांची त्याने आण्णांशी ओळख करुन दिली. त्या दिवशी तिथे गावकऱ्यांची एक सभा भरवण्यात आली. सभेत सर्वजण बोलले. आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आलं. अखेर संध्याकाळी कबीर संस्कृतीमंदिरात परत आला. तोपर्यंत अविनाशही तालुक्याहून परतला होता.

आता सर्वजण सज्ज झाले होते. पुढचे दोन दिवस धावपळीत गेले. आणि तिसऱ्या दिवसापासून म्हणजेच दोन ऑक्टोबर पासून श्रीवर्धनमधल्या क्रांती मैदानावर या आंदोलनाला सुरुवात झाली. दोन ऑक्टोबर ह्या दिवशी संपूर्ण देशात गांधीजयंती साजरी होत होती. आणि त्याच दिवशी गांधींजींच्या पावलावर पाऊल ठेवत या तिशीतल्या तरुणांनी देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या या ऐतिहासिक आंदोलनाला सुरुवात केली.

त्यासाठी एक छोटंसं स्टेज उभारण्यात आलं होतं. माईक ठेवण्यात आले होते. चंदनपूरातल्या ज्या मुलांना कबीर शिकवायला जायचा त्या मुलांनी अन्यायाविरुद्ध संदेश देणारे फलक तयार करुन दिले होते. कबीरचे अजून सात-आठ मित्र या आंदोलनात सहभागी झाले होते. स्टेजवर

बरेच जण होते, आणि मध्यभागी कबीर बसला होता. निश्चल, ध्यानस्थ! त्याने डोळे मिटले होते. तो परमेश्वराची आराधना करत असावा. या आमरण उपोषणासाठी त्याला त्याद्वारे शक्ती मिळत असावी. बऱ्याच मोठ्या क्रांती मैदानात जवळपास शंभर शेतकरी या आंदोलनात सहभागी झालेले दिसत होते. ही संख्या बरीच कमी दिसत असली तरी दिवसेंदिवस हे आंदोलन पेट घेईल याची अविनाशसह सर्वांनाच खात्री वाटत होती. पुढचे जवळपास दोन-तीन दिवस आंदोलनात सहभागी झालेल्यांची संख्या वाढली नाही. पण जसजशी ही बातमी वर्तमानपत्रांतून, डिजीटल मिडीयातून बाहेर पडू लागली तसतशे जिल्ह्यासह राज्यातले बरेच शेतकरी सोळा सोळा तासांचा प्रवास करुन या आंदोलनात सहभागी होण्यासाठी येऊ लागले. आंदोलनाच्या सातव्या दिवशी जवळपास निम्म क्रांतीमैदान शेतकऱ्यांनी भरुन गेलं होतं. विरोधी पक्ष या घटनेला आयती संधी समजून राज्य सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत होते. पण सातवा दिवस उजाडल्यामूळे

कबीरला शरीरातला अशक्तपणा जाणवू लागला होता. असं असलं तरी त्याला आनंद होत होता कारण, राज्य सरकारवर या आंदोलनाचा प्रभाव पडायला सुरुवात झाली होती. हे उपोषण प्रामुख्याने एका मागणीसाठी करण्यात येत होतं, त्या भ्रष्ट नेत्याला पायउतार करण्यासाठी. तसं असलं तरी आता चंदनपूरातल्या शेतकऱ्यांची समस्या अख्ख्या राज्यातल्या शेतकऱ्यांची समस्या झाली होती. सर्वजण राज्यातल्या कानाकोपऱ्यांतून श्रीवर्धनला येत होते. आता अकरावा दिवस उजाडला होता. मुख्यमंत्र्यांनी मिडीयाद्वारे 'मी त्या सर्वांच्या समस्या ऐकून घेईल आणि त्या सोडवण्याचा प्रयत्न करेल' असं आश्वासन दिलं होतं. 'आमच्या मंत्रिमंडळात जर कुणी भ्रष्ट नेता असेल तर कठोर कार्रवाई केली जाईल' असंही ते म्हणाले. अखेर आंदोलनाच्या बाराव्या दिवशी मुख्यमंत्री त्यांना भेटण्यासाठी आले, पण कबीरऐवजी अविनाश त्यांच्याशी बोलेल असं सर्वांनुमते ठरलं. जवळच्याच शासकीय विश्रामगृहात तो त्यांची भेट घेणार होता. तो तेथे पोहोचला तेव्हा त्या खोलीत मुख्यमंत्र्यांशिवाय कुणीही नव्हतं. समोरच एका आरामखुर्चीवर साहेब बसले होते. त्यांनी अविनाशलाही एका खुर्चीवर बसण्यास सांगितलं. अविनाश कमालीचा घाबरलेला होता. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी तो आयुष्यात पहील्यांदा बोलणार होता.

'नमस्कार!' अविनाश हात जोडत म्हणाला.

'नमस्कार!' साहेब म्हणाले.

'हे उपोषण कशासाठी करण्यात येतंय ते तरी आम्हाला सांगा.' साहेब म्हणाले.

अविनाशने मागच्या दिड महिन्यात घडलेली सर्व घटना साहेबांना सांगितली.

'असं होतं तर मग तुम्ही कोर्टात जायचं. उपोषणाने हा प्रश्न सुटेल असं वाटतंय का तुम्हाला?' साहेबांनी विचारलं.

'हो! असंच वाटतंय! आणि आमचा हा प्रश्न तुम्हीच सोडवाल याचीही मला खात्री आहे.' अविनाश म्हणाला.

'तुम्ही फार अतिआत्मविश्वासाने बोलताय असं नाही वाटत तुम्हाला?' साहेब म्हणाले.

अविनाश काहीच बोलला नाही.

'पण मी यात तुमची काही मदत करु शकेल असं मला नाही वाटत!' साहेब पुढे म्हणाले.

'मी तुम्हाला जे दाखवणार आहे ते बघितल्यानंतर तुम्ही तुमच्या मतावर ठाम राहाल असं मला वाटत नाही.' अविनाश म्हणाला तसं साहेबांच्या चेहऱ्यावरचं स्मितहास्य ओसरु लागलं.

'असं काय दाखवणार आहात तुम्ही?' साहेबांनी विचारलं.

अविनाशने सोबत आणलेला पेनड्राईव खोलीतल्या एका कंप्युटरला जोडला. साहेब न समजल्यासारखे पाहात होते. आणि अखेर अविनाशने तो व्हिडीयो चालू केला. पंधरा मिनीटांचा तो व्हिडीयो पाहून झाल्यावर साहेबांच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला होता.

'हे तुम्ही कसं काय...?' साहेब बोलताना अडखळत होते.

'हा व्हिडीयो जर एखाद्या न्युजचैनलवर दिसला तर तुमच्या पक्षाची किती बदनामी होईल याचा तुम्ही अंदाज लावू शकता.' अविनाश म्हणाला.

'तुम्ही धमकी देताय...' साहेब म्हणाले.

'अजिबात नाही! धमकी देणारा मी कोण? मी फक्त सत्य सांगण्याचा प्रयत्न करतोय साहेब. हे बघून तरी तुम्ही काही कराल अशी आशा करतो मी!' अविनाश म्हणाला.

साहेब गंभीर होऊन बसले होते. काय बोलावं ते त्यांना सुचत नव्हतं.

'मी काय करायला हवं असं तुम्हाला वाटतंय?' साहेब म्हणाले.

'तुम्ही बबनराव पाटलांना मंत्रीपदावरुन पायउतार करा. चंदनपूरातल्या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवणंच फक्त यामागचा उद्देश नाहीये. हे सर्व केल्याने सत्याचा विजय होईल. चंदनपूरातल्या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचल्या तर तो इतर कुणाच्यातरी जमिनी बळकावण्याचा प्रयत्न करेल. हे चक्र चालूच राहील. त्यामुळे तुम्ही त्यांना राजीनामा द्यायला लावा. याचं कारण जनतेसमोर आजच आणलं पाहीजे असं नाही.' अविनाश म्हणाला.

'पण हे सर्व...' साहेब बोलताना वारंवार अडखळत होते.

'मी इतकंच सांगू शकतो साहेब. लोकांचा लोकशाहीवरचा विश्वास टिकवायचा असेल तर हे करावंच लागेल असं मला वाटतं. असो! येतो मी आता. लवकरच काहीतरी चांगली बातमी ऐकायला मिळेल अशी आशा करतो मी.' असं म्हणत अविनाश निघाला.

तो क्रांती मैदानात आला तेव्हा तिथे मोठमोठ्याने घोषणा दिल्या जात होत्या. तो आल्याचं समजताच सर्वांमध्ये उत्साह संचारला. घडलेली सर्व घटना त्याने कबीरसह इतरांना सांगितली. आता आंदोलनाचा तेरावा दिवस उजाडला होता.

कबीरची तब्येत खालावत चालली होती. मुख्यमंत्र्यांना भेटून दोन दिवस होऊन गेले होते तरी ते यावर काही करण्यास तयार होत नव्हते.

महाराष्ट्रातल्या कितीतरी शेतकरी संघटना या आंदोलनाला येऊन मिळाल्या होत्या. अखेर अजून दोन दिवस वाट पाहील्यानंतर म्हणजेच पंधराव्या दिवशी तो व्हिडीयो जाहीर करायचं सर्वानुमते ठरलं. आणि तो व्हिडीयो सर्व न्युजचैनलवर झळकू लागला. जंगलात वणवा पेटावा तसा हा व्हिडीयो व्हायरल होत होता. विरोधक आधीपेक्षा अधिक आक्रामक झाले होते.

बननराव पाटलांनी राजीनामा द्यावा यासाठी राज्य सरकारवर दबाव आणला जात होता.

सोळावा दिवस उजाडला तेव्हा सकाळी सकाळीच कबीरला पाहण्यासाठी डॉक्टर आले होते. त्यांनी हे सर्व थांबवण्याचा सल्ला कबीरला दिला. ह्या सर्वाचा विपरीत परिणाम त्याच्या शरिरावर होईल असंही ते म्हणाले. पण कबीर मागे हटणारा नव्हता. जोपर्यंत सत्याचा विजय होत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालेल असं त्याने सांगितलं तसा सर्व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला.

सतरावा दिवस उजाडला होता. आज कोअर कमिटीची बैठक असल्यामुळे काहीतरी निकाल

लागेल याची सर्वांनाच आशा होती.

आणि अखेर तसंच झालं. दुपारी दोन वाजता बबनराव पाटलांनी आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केल्याची बातमी एका न्युजचैनलवर झळकली. सर्वांना आनंद होत होता. थोड्याच वेळात सर्व हिंदी आणि मराठी न्युजचैनल्सवर ही बातमी दिसू लागली.

शेवटी सत्याचा विजय झाला होता. इतक्या दिवसांपासूनच्या मेहनतीचं फळ त्यांना मिळालं होतं. क्रांती मैदानावर दिवसरात्र उभ्या असलेल्या समर्थकांमध्ये आता उत्साह संचारला होता. ते नाचू, गाऊ लागले होते. पण कबीर कुठे होता? तो त्याच्या जागेवरुन उठण्याचा प्रयत्न करत होता. तो कमालीचा अशक्त झाला होता. सर्व जण उत्साहात होते. घोषणा दिल्या जात होत्या. अशात कबीरकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. तो जागेवरुन उठला आणि उभा राहीला.

तेवढ्यात अविनाशचं त्याच्याकडे लक्ष गेलं. आणि तितक्यात कबीर चक्कर येऊन स्टेजवर पडला. तो पडल्याबरोबर अविनाश तिथे आला. बाजूलाच अँबुलन्सची व्यवस्था केली असल्यामुळे अविनाश त्याला उचलून अँबुलन्सपर्यंत घेऊन जाऊ लागला. तेवढ्यात अजुन दोन जणं त्याच्या मदतीला धावून आले. अविनाश ओरडत होता. त्याच्या डोळ्यात भिती दाटून आली होती. अँबुलन्समध्ये कबीरच्या बाजूला अविनाश बसला होता. त्याचा एक हात कबीरच्या डोक्याखाली होता. दुसरा हात तो त्याच्या डोक्यावरुन फिरवत होता. अँबुलन्स निरामय हॉस्पिटलकडे सुसाट धावत होती.

'कबीर! कबीर!' अविनाश त्याला थोपटत होता.

'थोडावेळ तग धर मित्रा! आपण लवकरच दवाखान्यात पोहचू!' अविनाश पुढे म्हणाला.

पण कबीरचं शरीर थंड पडू लागलं होतं. त्याला घाम सुटू लागला होता. दुपारी साडेतीन वाजता अँबुलन्स निरामय हॉस्पिटलला पोहोचली. कबीरला स्ट्रेचरवर टाकून सर्वजण आत घेऊन गेले. डॉक्टर कबीरला आत घेऊन गेले. सर्वजण बाहेर उभे होते. वातावरणात अचानक तणाव निर्माण झाला होता. अविनाश एका बाकावर बसला होता. जवळपास अर्ध्या तासाने डॉक्टर बाहेर आले. त्यांचा चेहरा गंभीर दिसत होता. तिथे जवळच उभ्या असलेल्या अतुलच्या खांद्यावर त्यांनी हात ठेवला. हे सर्व अविनाश पाहात होता.

'नाही! हे असं नाही होऊ शकत!' अविनाश मनातल्या मनात स्वत:शीच म्हणाला.

पण आता खुप उशीर होऊन गेला होता. त्याचा अंदाज खरा ठरला होता. तिथले सर्वजण चिंताग्रस्त दिसत होते. तिथे अचानक रडण्याचा आवाज ऐकू येवू लागला. तो आत गेला तेव्हा

कबीर झोपला होता. जणू थकून गेलेलं हे लेकरु आईच्या मांडीवर शांत झोपलं होतं. त्याचा श्वास थांबल्याचं अविनाशला जाणवलं. त्याला तिथे बसून खुप रडायचं होतं पण त्याच्या डोळयातून अश्रू येत नव्हते. बाहेर लोकांचा आकांडतांडव सुरु झाला होता. तो बाहेर आला तेव्हा काहीजण डॉक्टरांशी वाद घालत होते. तो तिथल्या खिडकीजवळ आला. क्रांती मैदानातले सगळे समर्थक दवाखान्याच्या खाली जमले होते. पोलिस त्यांना आत जाण्यापासून रोखत होते. हजारोंच्या संख्येने लोकं उभे होते. कबीर स्वत:ला अनाथ समजायचा. पण ही सर्व माणसं त्याची होती. कबीरसाठी ते तिथे उभे होते. अविनाश विचार करत होता. डॉक्टरांनी त्याच्या मृत्यूचं कारण काहीही सांगितलं असलं तरी अविनाशला एक गोष्ट ठाऊक होती, महान लोकं आपलं कार्य झाल्यानंतर लगेच निघून जात असतात.

खूप वर्षांपूर्वी ऐकलेली ही गोष्ट कबीरने आज सिद्ध करुन दाखवली होती.

कबीरने आयुष्यात काय कमवलं होतं हे तो स्वत:च्या डोळयांनी समोर पाहू शकत होता. त्याच्या डोळयासमोर त्याचा भूतकाळ वारंवार येत होता. त्याला कुठेही न लाभलेली शांतता कबीरजवळ लाभली. त्याच्या आयुष्याला कबीरमुळे पूर्णत्व मिळालं होतं. खरंतर आपल्या प्रत्येकालाच पूर्ण करणारं असं कुणी ना कुणी असतं. पण प्रत्येक मुलगा त्या व्यक्तीला कुठल्यातरी मुलीत शोधत असतो, त्याचप्रमाणे प्रत्येक मुलीला तिला पूर्ण करणारी व्यक्ती एखादा मुलगा असेल असं वाटत असतं. पण खरंतर आपल्याला पूर्ण करणारी व्यक्ती कुणीही असू शकते. ते एखादं लहान बाळ असू शकतं, किंवा एखादी वयस्कर व्यक्तीही असू शकते. पण अविनाशला पूर्ण करणारा कबीर होता.

या घटनेनंतर आता दोन वर्ष उलटून गेली आहेत. अविनाश अजूनही संस्कृतीमंदिरातच असतो. पण आता संस्कृतीमंदिराचं स्वरुप बदललंय. पूर्वी तिथे केवळ चर्चेला, आध्यात्माला महत्व दिले जात असे. पण आता तिथे कर्माला महत्व दिलं जातं. संस्कृतीमंदिरामार्फत आता बरेच उपक्रम राबवले जात असतात. आता तिथे अशिक्षितांसाठी शिकवणी वर्ग चालू केले आहेत. स्वच्छता अभियान राबवले जात आहेत.

अलिकडे त्यांनी गरीबांना अन्नपुरवठ्याचं काम हाती घेतलं आहे. लग्नसोहळयांमधील उरलेलं चांगलं अन्न ते गरीबांना उपलब्ध करुन देत असतात. थोडक्यात सांगायचं झालं तर संस्कृतीमंदिर आता फक्त आध्यात्मिक केंद्र राहीलं नव्हतं, तर ते एक सामाजिक केंद्र बनलं होतं. तिथे आलेल्या लोकांच्या सर्व प्रकारच्या सामाजिक समस्या ते सोडवू लागले होते. जणू कबीर

कुठे गेलाच नव्हता. तो तिथेच होता, सर्वांना प्रेरणा देण्यासाठी...

## ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com